cmyk

## संपादकीय

### चूकल्यास न्यायालयाचे बोलणे खावेच लागणार...

सध्या राज्य सरकारची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना फुल्ल फॉर्ममध्ये आहे. या योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात चांगलीच जुंपली आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने पुण्यातील एका जमीन अधिग्रहण प्रकरणी राज्य सरकारची कानउघाडणी करताना म्हटले की, जमिनीचा मोबदला देण्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत पण 'लाडकी बहीण' योजनेसाठी पैसे आहेत. जर याचिकाकर्त्याला जमिनीचा मोबदला मिळाला नाही तर 'लाडकी बहीण'सारख्या योजनेवर बंदी घालण्याचे आदेश आम्हाला द्यावे लागतील. तातडीने सर्वमान्य तोडगा काढला नाही तर अधिग्रहित जमिनीवरील बांधकाम तोडून टाकण्याचे आदेश देऊ असेही न्यायालयाने बजावले.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### प्रकाश आंबेडकरांच्या वंचितला गॅस तर बच्चू कडूंच्या प्रहारला बॅट चिन्ह

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांची मोर्चेबांधणी सुरू आहे. वंचित बहुजन आघाडीला विधानसभा निवडणुका लढण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने 'गॅस सिलेंडर'हे नवे चिन्ह दिले आहे. तर आ.बच्चू कडू यांच्या प्रहारला बॅट चिन्ह मिळाले आहे. केंद्रीय निवडणूक आयोग सचिवालयाकडून एक पत्र जारी करण्यात आले आहे. त्यामध्ये ही घोषणा केली आहे. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांत काही ठिकाणी कपबशी, तर काही ठिकाणी गॅस सिलेंडर अशा वेगवेगळ्या चिन्हांवर वंचितने निवडणूक लढवली होती. तर बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाने अनेकदा कपबशी चिन्हावर निवडणूक लढवली होती. लोकसभा निवडणुकीत प्रहारला शिट्टी हे चिन्ह मिळाले होते. यानंतर आता प्रहार पक्षाला पुढच्या निवडणुका 'बॅट'या चिन्हावर लढवाव्या लागणार आहेत.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–११६ | शनिवार दि.१७ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# हमीभाव कायद्याच्या मागणीवर शेतकरी ठाम

## हरियाणा, पंजाब, राजस्थानमध्ये शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर मोर्चा

नवी दिल्ली

संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजूर मोर्चाने पंजाबमधील वाघा सीमेवर ट्रॅक्टर मोर्चा काढला. तर हरियाणा, राजस्थान आणि उत्तरप्रदेशमध्येही काही जिल्ह्यात शेतकरी मोर्चा काढण्यात आला. तसेच शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्याशिवाय आम्ही माघार घेणार नाहीत, अशी भूमिका खनौरी सीमेवर संयुक्त किसान मोर्चाचे जगजीतसिंह डल्लेवाल यांनी जाहीर केली.



संयुक्त किसान मोर्चा अराजकीय आणि मजूर मोर्चाने हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांसाठी १३ फेब्रुवारी २०२४ पासून दिल्ली चलो आंदोलन पुकारले आहे. परंतु हरियाणा राज्य सरकारने आंदोलक शेतकऱ्यांना सीमेवर रोखलेले आहे. त्याचा निषेध करत शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर मोर्चा काढला. यामध्ये हजारो शेतकरी सामील झाल्याचा दावा शेतकरी संघटनांनी केला आहे. किसान मजूर मोर्चाचे नेते सरवणसिंह पंढेर यांनीही मागण्यावर ठाम असल्याचे जाहीर केले. ते म्हणाले, "मागील सहा महिन्यांपासून शेतकरी हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांवर ठाम आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी ताकद दाखवली आहे. सरकारने शेतकऱ्यांची ताकद कमी आहे असे समजू नये." असेही पंढेर म्हणाले.

### सीमा उघडल्यानंतर ट्रॅक्टर-ट्रॉली दिल्ली चलो मोर्चा

दरम्यान, हरियाणा सरकारला न्यायालये सीमा खुल्या करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सीमा खुल्या झाल्यानंतर शेतकरी दिल्लीकडे कूच करतील. तसेच ट्रॅक्टर-ट्रॉली दिल्ली चलो मोर्चा पुन्हा सुरू करण्यात येईल. आम्ही सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना दिलेल्या निर्णयाची कार्यवाही कधी केली जाते याची वाट पाहत आहोत, असेही पंढेर म्हणाले.

# महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लांबणीवर

## हरियाणा, जम्मू आणि काश्मीरसाठी तारखा जाहीर

नवी दिल्ली । वृत्तसेवा

केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्रवारी (दि.१६) दोन राज्यातील निवडणुकीचे वेळपत्रक जाहीर केले. मात्र महाराष्ट्रातील निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणुकाची घोषणा केली. जम्मू आणि काश्मीरमध्ये तीन टप्प्यात निवडणूक होणार आहेत. पहिला टप्प्यासाठी १८ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. तर दुसऱ्या २५ आणि तिसऱ्या टप्प्यासाठी १ ऑक्टोबर रोजी मतदान होईल. हरियाणामध्ये मात्र एकाच



टप्प्यात म्हणजेच १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. या दोन्ही राज्यांची मतमोजणी ४ ऑक्टोबर रोजी पार पडणार आहे.

२०१९ मध्ये महाराष्ट्र आणि हरियाणामध्ये एकाच दिवशी म्हणजे २१ ऑक्टोबर रोजी विधानसभेसाठी मतदान झाले होते. त्यामुळे यंदाही हरियाणा आणि महाराष्ट्रामध्ये एकाच ◀◀ पान २ वर



बीड:– खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी हॉटेल सनराईजला भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष आणि हॉटेल सनराईजचे प्रोप्रायटर ॲड. सुभाष राऊत यांच्यासह हॉटेलचे व्यवस्थापक व कर्मचारी दिसत आहेत.

# लोकशाहीला अजूनही धोका कायम

### लढाई एकजुटीने लढू, मविआच्या मेळाव्यात शरद पवारांचा एल्गार

मुंबई । प्रतिनिधी

देशावरचे संकट अद्याप गेलेले नाही. लोकशाहीला अजूनही धोका कायम आहे. राज्याचे चित्र बदलायचे असेल तर इथले सरकार बदलल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे ही लढाई एकजुटीने लढू, असा एल्गार राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) सर्वेसर्वा शरद पवार यांनी केला. महाविकास आघाडीच्या महामेळाव्यातून ते बोलत होते.

शरद पवार म्हणाले की,



आपण स्वातंत्र्य दिवस साजरा केला. उद्याची महाराष्ट्राची दिशा काय राहणार आहे? महाराष्ट्रावर जे काही संकट आहे त्यातून राज्याची सुटका कशी करता येईल हे या सभेच्या माध्यमातून पोहचवण्यासाठी ◀◀ पान २ वर


# फडणवीसांचा मुका आम्ही घेऊ, पण तुम्ही पवारांचा मुका घ्यायचं बंद करा

## प्रसाद लाड यांचा मनोज जरांगे यांच्यावर हल्लाबोल; थेट केले आव्हान

मुंबई । प्रतिनिधी

तुम्ही पर्वा दरेकरांना म्हणालात घरात घुसू, पंखे तोडू. तुमच्यात हिंमत असेल तर मुंबईत या. हे सगळे उद्योग आणि धंदे बंद करा. देवेंद्र फडणवीसांचा मुका आम्ही घेऊ, पण तुम्ही शरद पवारांचा मुका घ्यायचे बंद करा. मराठा आंदोलनाचे राजकारण करुन त्याला खड्ड्यात घालण्याचे काम करु नका, असे म्हणत भाजप नेते प्रसाद लाड यांनी थेट मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना आव्हान दिले आहे. ते मुंबईत बोलत होते.

आम्ही ज्या भागात लहानाचे मोठे झालो ते





हे धंदे करुनच मोठे झालो

प्रसाद लाड म्हणाले, एखाद्या व्यक्तीमत्वाचं किंवा आंदोलनाचे सन्मान किती करायचा याची एक वेळ असते, एक ◀◀ पान २ वर

# महायुतीचे टेंशन वाढले; मित्रपक्षांकडून कोंडी

नांदेड । प्रतिनिधी

महायुतीतील तीन प्रमुख पक्षांमध्ये जागावाटपावरून जोरदार रस्सीखेच सुरू असताना आता त्यामध्ये आणखी एका पक्षाने उडी घेतली आहे. विधानसभेसाठी आम्हाला ३३ जागा द्या, आगामी राज्यसभेच्या निवडणुकीक एक जागा द्या अशी मागणी पीपल्स रिपब्लिक पार्टीने केली आहे. महायुतीमध्ये आम्हाला सन्मानजनक जागा मिळतील अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी नांदेड जिल्ह्यातील देगलूर विधानसभेसाठी एक उमेदवारही जाहीर केला आहे.

पीपल्स रिपब्लिकन पक्षाने (कवाडे गट) नांदेडमधील देगलूर मतदारसंघातून बापूराव



### विधानसभेसाठी ३३ जागा द्या, एक उमेदवारही जाहीर केला

गजभारे यांच्या नावाची घोषणा केली आहे. यावेळी पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख जोगेंद्र कवाडे यांनी ही घोषणा केली. तसेच आगामी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पीपल्स रिपब्लिकन पक्षाला सन्मानजनक जागा मिळाव्यात अशी मागणीही केली.

विधानसभेच्या ३३ जागा आणि राज्यसभेवर संधी द्या

◀◀ पान २ वर

# आ. संदीप क्षीरसागर यांना पुन्हा एकदा आशीर्वाद द्या

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलासह खा. अमोल कोल्हे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

गेले पाच वर्षात आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केलेली आहे. त्यामुळे या पुढे सुद्धा त्यांना पुन्हा एकदा आशीर्वाद द्या, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी शिवनेरी किल्ल्याहून निघालेली शिवस्वराज्य यात्रा गुरूवारी (दि.१५) रोजी बीड येथे आली होती. यावेळी पाटील बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काढण्यात आलेल्या या यात्रेला बीडमध्ये मोठ्या उत्साहात प्रतिसाद

◀◀ पान २ वर



### सरकार महाविकास आघाडीचे येणार आणि जिल्ह्याचे नेते संदीप क्षीरसागर असणार– खा.बजरंग सोनवणे

लोकसभा निवडणुकीत बीड तालुक्याने संदीप भैय्यांच्या नेतृत्वाखाली इतिहास मोडत तब्बल एक लाख दोन हजार मतांची लीड दिली. संदीप भैय्यांनी दिलेली साथ मी कधीही विसरणार नाही. अडचणीतून बाहेर पडण्याची कला आणि कसब संदीप भैयांमध्ये प्रचंड प्रमाणात आहे याची प्रचिती मी लोकसभा निवडणुकी दरम्यान अनुभवली आहे. येणारा काळात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे आणि जिल्ह्यात नेते हे संदीप भैयाच असणार असे खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त होताना म्हटले.

### राजकारणात भूमिका खूप महत्वाची– आ.संदीप क्षीरसागर

माझ्याकडून जनतेला खूप सारे अपेक्षा होत्या परंतु भूमिकेशी एकनिष्ठ राहून आणि जनसामान्यांच्या मतावर ठाम राहून मी सत्तेत सहभागी झालो नाही त्यामुळे आपल्या मतदारसंघाला निधी मिळू शकला नाही. डीपीडीसी आणि इतर बाबींमध्ये आपली सातत्याने आढळून कशाप्रकारे केले गेले हे सर्वश्रुत आहे. परंतु मतदार संघातील मायबाप जनतेने माझ्यावर खूप विश्वास ठेवला त्यामुळे मला त्यांच्यासाठी खूप काही करायचे आहे. येणाऱ्या काळात आपले सरकार येणार असून सहा महिन्याच्या आत मतदारसंघातील महत्वाचे असलेले विविध प्रश्न मार्गी लावणार असल्याची ग्वाही आ.संदीप क्षीरसागर यांनी दिली.

# केसापुरी–ढोरवाडीच्या ग्रामपंचायत प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांचा दणका!

### सरपंच, सदस्य दाम्पत्याला ठरवले अपात्र

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील केसापुरी–ढोरवाडी ग्रामपंचायत निवडणूक झाल्यानंतर सरपंच आणि सदस्य असलेले माने दाम्पत्याला अपात्र करण्यासाठी विरोधात अनिता काळे यांनी ॲड.दिपक कुलकर्णी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात अपील केले होते. यावर जिल्हाधिकारी यांनी निर्णय दिला असून सरपंच व सदस्य यांना अपात्र ठरविले आहे.



वडवणी तालुक्यातील केसापुरी व ढोरवाडी गावांची ग्रुप ग्रामपंचायत आहे. २०२२ मध्ये पार पडलेल्या सार्वत्रिक ग्रामपंचात निवडणुकीअंतर्गत १८ डिसेंबर २०२२ रोजी केसापुरी–ढोरवाडी ग्रामपंचायत साठी मतदान होऊन २० डिसेंबर २०२२ रोजी निकाल लागला. सदरील निवडणुकीत या ग्रामपंचायतीसाठी 'अनुसूचित जाती' प्रवर्गासाठी सरपंच पद सुटले होते. यावर गैरअर्जदार असलेले आत्माराम सखाराम माने यांनी सरपंच पदासाठी असलेल्या प्रभाग क्रमांक ९९९ मधून 'व्होलर–अनु.क्रं.२६' या जातीच्या प्रमाणपत्राधारे निवडणूक लढवून सरपंच पदी निवडून आले. तसेच सरपंच श्री.माने यांच्या पत्नी असलेल्या कालिंदा ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,३०० | २,६३५ | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड :५९.५० क्विंटल | २,१३१ | २,६०१ | २,३२० |
| मूग :१.५० क्विंटल | ७,७०० | ७,७०० | ७,७०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,७०१ | ७,७०१ | ७,७०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,४७१ | ३,३९० | २,७५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | ६,५८० | ६,५८० | ६,५८० |

# केज तालुक्यात काळविटाची शिकार

## सहा जणांना रंगेहात अटक करत गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

सुरक्षा व्यवस्थेबाबत राज ठाकरेंनी व्यक्त केली नाराजी केज तालुक्यातील केकत सारणी येथील शिवारात काळवीट जाळ्यात पकडून त्याची मान धारदार शस्त्राने कापून शिकार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ही माहिती धारूर वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तम चिकटे यांच्या आदेशाने वनरक्षक वचिष्ट भालेराव, वाहन चालक शाम गायसमुद्रे हे तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृत काळवीटसह सहा जणांना रंगेहाथ अटक केली. त्यानंतर चंदनसावरगाव येथील पशू वैद्यकीय दवाखान्यात या काळवीटचे शवविच्छेदन करण्यात आले. केज तालुक्यात काळवीटची शिकार करून त्याचे मांस व कातड्याची तस्करी करणारे मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# आरोग्य कर्मचाऱ्यास मारहाण झाल्यास आता ६ तासांत गुन्हा नोंद होणार

नवी दिल्ली । वृत्तसेवा

कोलकाता येथील महिला निवासी डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर केंद्र सरकारने आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत अशा घटना झाल्यावर ६ तासांत एफआयआर नोंदवावा लागेल. एफआयआर दाखल करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असेल. यासाठी केंद्र सरकारने सर्व राज्यांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

केंद्र सरकारच्या या आदेशानुसार आरोग्य ◀◀ पान २ वर




# शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या पवनचक्की कंपन्यांचे काम थांबवा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटवरील १०–१२ गावांच्या परिसरात पवनचक्की उभारल्या जात आहेत. हे काम करणाऱ्या रेणू पॉवर, ओटू पॉवर, ग्रीन पॉवरसह इतर कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांसोबत अरेरावीची भाषा करतात. अनेकांना मोबदला मिळालेला नाही. अशा प्रकारे शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या पवनचक्की कंपन्यांचे काम तत्काळ थांबवावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे शुक्रवारी (दि.१६) केली आहे.

### कंपन्यांवर कारवाई करू : जिल्हाधिकारी

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवेदनानुसार, पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन निवेदनातील नमूद विषयावर कार्यवाही करतो, असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच, पीडित शेतकऱ्यांनी तक्रार करताना कंपनीसोबत केलेले करार पत्र, मिळालेले चेक, इतर कागदपत्रे सोबत जोडूनच अर्ज करावेत, अशा सूचनाही त्यांनी केल्या. दरम्यान, पवनचक्की कंपन्यांच्या मनमानीला चाप असेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात होती.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, बीड तालुक्यातील बालघाटावरील अनेक गावात पवनचक्की उभारल्या आहेत. हे काम करणाऱ्या कंपन्यांनी शेतीमध्ये टॉवर उभारले असून या टॉवरवरील तारा ओढताना बीड तालुक्यातील बोरखेड ते हिंगणीपर्यंत शेती पिकांचे अतोनात नुकसान होणार आहे. त्याची शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची भरपाई दिली जात नाही. तसेच, टॉवर व ◀◀ पान २ वर



cmyk

अग्रलेख

# चूकल्यास न्यायालयाचे बोलणे खावेच लागणार...

सध्या राज्य सरकारची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना फुल्ल फॉर्ममध्ये आहे. या योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात चांगलीच जुंपली आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने पुण्यातील एका जमीन अधिग्रहण प्रकरणी राज्य सरकारची कानउघाडणी करताना म्हटले की, जमिनीचा मोबदला देण्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत पण 'लाडकी बहीण' योजनेसाठी पैसे आहेत. जर याचिकाकर्त्याला जमिनीचा मोबदला मिळाला नाही तर 'लाडकी बहीण'सारख्या योजनेवर बंदी घालण्याचे आदेश आम्हाला द्यावे लागतील. तातडीने सर्वमान्य तोडगा काढला नाही तर अधिग्रहित जमिनीवरील बांधकाम तोडून टाकण्याचे आदेश देऊ असेही न्यायालयाने बजावले.

याचिकाकर्त्याचे नाव टी. एन. गोदाबर्मन असे असून त्यांच्या पूर्वजांनी पुण्यात २४ एकर जमीन ५० च्या दशकात खरेदी केली होती. राज्य सरकारने ही जमीन आपल्या ताब्यात घेतली, पण त्यांना त्याबाबतचा मोबदला दिला नव्हता. सरकारने ही जमीन संरक्षण विभागाच्या शिक्षा संकुलाला देण्यात येणार असल्याचे सांगितले. तेव्हा गोदाबर्मन यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने त्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यावेळी राज्य सरकारच्या वतीने सांगण्यात आले की, आम्ही गोदाबर्मन यांना मोबदला म्हणून जमीन दिली आहे, मात्र प्रत्यक्षात त्यांना वन जमीन देण्यात आली. याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्व खटले जिंकले होते. असे असतानाही अद्याप भरपाई देण्यात न आल्याने जमीनमालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर मंगळवारी न्या. भूषण गवई आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी पुन्हा एकदा राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेचा उल्लेख करताना न्यायालयाने सरकारवर ताशेरे ओढले आणि राज्य सरकारला या संदर्भात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले. 'लाडकी बहीण'सारख्या योजना जाहीर करून त्याचे पैसे वितरीत करण्यास राज्य सरकारकडे निधी आहे, मग ज्या व्यक्तीची जमीन संपादित केली आहे, ज्यावर बेकायदेशीर ताबा केला आहे, त्याला त्याचा योग्य मोबदला का दिला नाही, असा सवाल खंडपीठाने केला. न्यायालयाच्या आदेशांना गृहित धरू नका, वर्तमानपत्रात काय प्रसिद्ध झाले त्याची आम्हाला कल्पना आहे. तुमच्याकडे 'लाडकी बहीण'सारख्या मोफत योजनांसाठी निधी आहे. मात्र एका सर्वसामान्य नागरिकाच्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी निधी नाही का? अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला खडसावले. याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांनी त्वरित मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी आणि मोबदला देण्याबाबत तोडगा काढावा. योग्य मोबदला मिळाला नाही तर 'लाडकी बहीण' योजना बंद करण्याचे आदेश आम्हाला द्यावे लागतील असे खंडपीठाने म्हटले.

सध्याच्या धावपळीच्या जगात सारेच धावत सुटले आहेत. एकमेकांशी बोलायला, थांबायला, विचारपूस करायला कुणाला वेळच नाही. मग भेटणे तर दूरच. अशा रीतीने हळूहळू नात्याचे बंध सैल होत चालले आहेत. एकेकाळी 'ताई-माई-अक्का, विचार करा पक्का आणि अमक्या-तमक्या उमेदवाराच्या निवडणूक चिन्हावर मारा शिक्का' असे प्रेमळ आवाहन मतदारांना केले जात होते. मतदारही मोठ्या प्रेमाने आवाहनाला प्रतिसाद देत होते. मतदारही आपल्या शिक्क्यामुळे राजकारणात घराणेशाही पक्की होत आहे काय याबाबत फारसा विचार करत नव्हते. राजकारणात घराणेशाही नवी नाही परंतु आता राजकारणात नात्यांना भलतेच उधाण आले आहे. एकीकडे कौटुंबिक नातेसंबंध, नातीगोती विकलांग होत असताना राजकीय क्षितिजावर मात्र बहीण-भावाच्या लाडकेपणाचा जणू काही बांधच फुटला आहे. म्हणजे मूळ नात्यांपेक्षा तकलादू नात्यांना राजकारणात 'अच्छे दिन' आले आहेत. मध्य प्रदेश सरकारने 'मुख्यमंत्री लाडली बहन' योजना आणली. या योजनेला तुफान प्रतिसाद मिळाला आणि या प्रतिसादाचे मतांमध्येही रुपांतर झाले. त्यामुळे ती राजकारण्यांची लाडकी योजना बनली. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'योजना जाहीर केली. राज्यातील महिलांना आर्थिक स्वातंत्र्य लाभावे आणि त्यांचे आरोग्य सुधारावे या उद्देशाने ही योजना आखण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांची झुंबड उडाली आहे. राजकीय मन मात्र वेगळा विचार करत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत या योजनेचे श्रेय लाटण्याच्या विचारात राजकीय मन मग्न आहे. त्या विचारातूनच आगामी निवडणुकीत मला मतरूपी आशीर्वाद न दिल्यास लाडकी बहीण योजनेचे दीड हजार रुपये खात्यातून काढून घेईन, असे आमदार रवी राणा बरळले. त्यांच्या बरळण्यामुळे विरोधकांना सत्ताधाऱ्यांविरुद्ध रान उठवण्यास आयते कोलित मिळाले. निधी नाही म्हणून सरकारी शाळा बंद पडणार नाहीत याचीही काळजी घ्यायला हवी. राज्यातील अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प निधीअभावी पडून आहेत. निधी आवश्यक तेथेच खर्च होतोय यावर सरकारची नजर हवी, नाहीतर न्यायालयाच्या थपडा खाव्या लागतील.

# संवाद यात्रेमुळे राज्यात पत्रकारांचा संवाद पूल साधला

## सदाभाऊ खोत ह्यांचे गौरवोद्गार; वसंत मुंडे चळवळीतील हाडाचा कार्यकर्ता

बत्तीस शिराळा (जि. सांगली), दि. १६ : ''पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यामध्ये पत्रकारांचा संवाद पूल बांधला गेला आहे,'' असे कौतुकोद्गार माजी मंत्री व लढवय्ये आमदार सदाभाऊ खोत ह्यांनी आज काढले. ह्या यात्रेचे सूत्रधार व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे ह्यांचे त्यांनी भरभरून कौतुक केले.

पत्रकारांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी संघाने काढलेली दीक्षाभूमी (नागपूर) ते मंत्रालय (मुंबई) पत्रकार संवाद यात्रा आज दक्षिण महाराष्ट्रात पोहोचली. संघाचे पदाधिकारी व यात्रेत सहभागी झालेले सर्व पत्रकार ह्यांचे बत्तीस शिराळा (जि. सांगली) येथे श्री. खोत ह्यांनी स्वागत केले. यात्रेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

शेतकरी-शेतमजूर ह्यांच्या प्रश्नांसाठी आम्ही काढलेल्या यात्रांची तुमच्या यात्रेमुळे आठवण झाली, असे सांगून श्री. खोत म्हणाले, ''एवढ्या मोठ्या पल्ल्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच यात्रा असावी. या माध्यमातून राज्यातील पत्रकारांमध्ये संवादाचा पूल बांधला गेला, हे मला तिचे सर्वांत मोठे यश वाटते. ही एक चळवळ आहे. ह्या चळवळीचा पुढचा प्रवास



अशा पुलामुळे सहज आणि सोपा होतो. वसंत मुंडे ह्यांच्यासारख्या हाडाच्या कार्यकर्त्याबरोबर राज्यातील पत्रकारांनी राहावं, त्यांना साथ द्यावी, असं मी नक्कीच सांगीन.'' पत्रकार म्हणजे गावगाड्यातील हेरच होत. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळातही हेरखाते होते. बहिर्जी नाईक आणि त्यांचे सहकारी हे काम करीत. हेरमंडळी राज्याचे डोळे असतात. राज्यात काय चालले आहे, हे ते राजाला दाखवून देतात, असे सांगून श्री. खोत म्हणाले की, अशा आधुनिक हेरखात्यावर सरकारने मायेची पाखर घालावी, मदतीचा हात द्यावा, ही माझी अपेक्षा आहे.प्रदेशाध्यक्ष मुंडे ह्यांच्याशी पत्रकारितेच्या पलीकडचे नाते असल्याची आठवण करून देत श्री. खोत म्हणाले, ''आमचे नाते चळवळीचे, गावगाड्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरचे आहे. शरद जोशीसाहेबांच्या चळवळीच्या निमित्ताने आमचे संबंध आले. वसंतराव हाडाचा कार्यकर्ता, गावगाड्यातला कार्यकर्ता आहे. सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नाची त्यांना जाण आहे. अशा चांगल्या माणसाबरोबर खऱ्या अर्थानं पत्रकारांनी राहायला पाहिजे.''पत्रकारांना राज्य सरकारने जपले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करताना श्री. खोत म्हणाले की, कोणतीही व्यवस्था निश्चितच परिपूर्ण असत नाही. परंतु कमीत कमी दोष ठेवून चांगल्या व्यवस्थेकडे आपल्याला जायचे आहे. प्रत्येक व्यवस्थेमध्ये दोष असतातच. कचरा पडलेले पाणी आपण गाळून घेतो, त्याच पद्धतीने प्रत्येक व्यवस्थेमधील दोष गाळून पुढे जावे लागेल.

# वडीकाळ्या गाव समृद्ध कोट्यवधीचे विकास कामे पूर्ण करून सतीश घाटगे यांनी फोडले विकासाचे नारळ

**अंबड । प्रतिनिधी**

तालुक्यातील वडीकाळ्या गाव आणि गावाअंतर्गत येणारे लालसिंग नाईक तांडा व दुर्गा नाईक तांडा मुलभूत सोयी सुविधांपासून वंचित होते. या गावाला शासनाच्या माध्यमातून सतीश घाटगे यांनी समृद्ध केल आहे.

प्रामाणिक करदात्यांच्या पैशातून आणि महाराष्ट्र सरकारच्या सहकार्यातून या ठिकाणी १ कोटी १५ लाख रुपयांचा निधी सतीश घाटगे यांनी मिळवून दिला. त्यातून तयार झालेल्या रस्त्याचे गावकऱ्यांच्या साक्षीने सतीश घाटगे यांनी गुरुवारी



लोकार्पण केले. तसेच नव्याने १ कोटी ३३ लाख रुपयांच्या शेत रस्ते खडीकरण व सभामंडपाच्या कामाचेही उद्घाटन केले.

याप्रसंगी गावकऱ्यांचा उत्साह येणाऱ्या काळात परिवर्तनाची साक्ष देणारा होता. गावच्या विकासासाठी राजकारण बाजूला ठेवून एकत्र आलेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्याचे घाटगे साहेबांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी आसाराम चव्हाण , भगवान ढेबे, संदीप चव्हाण, गणेश नरवडे, गजानन रक्ताटे, योगेश गव्हाणे, नामदेव काळे , भरत तनपुरे, पंकज रक्ताटे, दिलीप राठोड, मनोज मुळे, शिवाजी राठोड आदींनी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन

सर्व तमात जनतेस व विशेषतः पालवण येथील जनतेस या जाहीर प्रगटणाव्दारे

कळविण्यात येते की, आमचे पक्षकार अनुक्रमे १) सचिन राधाकृष्ण कुलकर्णी २) हेमलता श्रीधर मोटेगांवकर ३) सुधीर राधाकृष्ण कुलकर्णी सर्व रा. पालवण ता. जि. बीड येथील एकत्रित कुटूंबाची वडिलोपार्जित मौजे पालवण ता. जि. बीड येथील जमिन गट नंबर २००/२९३,४९१/३५६,४९०/३५७ मधील जमिनीच्या संदर्भात मा. दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) बीड यांचे न्यायालयात रे. दि.दा.क्रं.५५४/२०१५ रविंद्र विरूध्द सचिन व इतर तसेच नियमित दिवाणी दावा अपिल क्र.१०५/२०२२ सचिन व इतर विरुद्ध रविंद्र व इतर हा कोर्टात प्रलंबीत असून या वादग्रस्त जमिनीच्या दाव्यातील वादी व आमचा भाऊ नामे रविंद्र राधाकृष्ण कुलकर्णी रा. पालवण ता. जि. बीड हा आमचे परस्पर व आमचे पक्षकार यांना विचारात न घेता इतरत्र लोकांना सदर विक्री करण्याचा प्रयत्नात असल्याबाबतची खात्रीलायक माहिती आमचे पक्षकार यांना मिळालेली आहे.

या जमिनीचे वाटणी पत्रक अद्याप झालेले नाही. त्यामुळे वर नमुद जमिनीच्या संबंधाने कोणीही खरेदी विक्री, व्यवहार, ईसारपावती, ताबा पावती, बक्षीसपत्र, खरेदीखत, गहाण, दान, मुख्त्यारनामा व इतर अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करू नये. जेणे करून आमचे पक्षकारांना सदरील दाव्यात पार्टी जमिन घेणाऱ्यांविरूध्द दोषारोप दाखल करण्यात येईल. त्यामुळे नमुद गटातील जमिनीशी कोणीही व्यवहार आमचा भाऊ रविंद्र राधाकृष्ण कुलकर्णी यांचेशी करू नये जे की, आमचे पक्षकार यांचे बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरील जमिनी बाबत कोर्टात प्रकरण प्रलंबीत असतांना वादग्रस्त मिळकतीबाबत प्रतिवादीचे जवळचे नातेवाईक म्हणजेच भाऊ नामे रविंद्र राधाकृष्ण कुलकर्णी हे सदर मिळकतीबाबत व्यवहार करण्याचे असे दिसत आहे. जर सदर प्रकरणात कोर्टात दावा चालु आहे. कोणी सदर वादग्रस्त गट नंबर २००/२९३,४९१/३५६, ४९०/३५७ मधील जमिनीचा कोणताच कसलाच देण्याघेण्याचा जमिन हस्तांतरणाचा व्यवहार करू नये सदर प्रकरणात जर कोणी व्यवहार केला तर त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही त्याचे वर राहील व पुढील परिणामाची जबाबदारी ही त्याची राहील. करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. दिनांक :- ०४.०८.२०२४.

ठिकाण :- बीड

**जाहीर प्रगटण देणार - १) सचिन राधाकृष्ण कुलकर्णी २) हेमलता श्रीधर मोटेगांवकर, ३) सुधीर राधाकृष्ण कुलकर्णी सर्व रा. पालवण ता. जि. बीड मो. नं. ८३२९४८७३१५**

**मार्फत - ॲड. आर. डी. सोळंके, बीड मो.नं. ९८२२५३२८५३.**

पान १वरून...

### फडणवीसांचा मुका आम्ही

सन्मान असतो. परंतु वेळोवेळी एखाद्या गोष्टीचे राजकारण करुन समाजकारणाला खड्ड्यात घालण्याचं काम मनोज जरांगे पाटील करणार असतील. देवेंद्र फडणवीसांचा मुका घ्या, त्यांना जे करायचंय ते करा. मी बघून घेईल, असं म्हणतात. मनोज जी मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो. आम्ही ज्या भागात लहानाचे मोठे झालो ते हे धंदे करुनच मोठे झालो, असंही प्रसाद लाड यांनी सांगितले आहे.

पुढे बोलताना प्रसाद लाड म्हणाले, मी तुम्हाला स्पष्टपणे, प्रामाणिकपणाने आणि प्रेमाने सांगितले होते. हिंमत असेल तर राजकारणात या. राजकारणातले संविधानाचे प्रश्न सोडवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाचे प्रश्न सोडवा. तुम्ही जर खालच्या पातळीवर जाऊन भाषा वापरणार असाल तर आम्ही सौम्य पणाने उत्तर देत आहे. याच्या पुढचे उत्तर तुमच्या उत्तरापेक्षा घाणेरडं असेल. हे डोक्यात ठेवा आणि लक्षात ठेवा, असेही लाड म्हणाले.

मनोज जरांगे काय काय म्हणाले होते?

सत्ताधाऱ्यांनी गोरगरिबांना न्याय द्यायचा नाही ठरवलं आहे. त्यामुळे गोरगरिबांनी ठरवले आहे त्यांना खुर्ची द्यायची नाही. २० तारखे पर्यंत चित्र बदललेले दिसत, देवेंद्र फडणवीस यांचे गणित फेल होणार आहे. मला हलक्यात घेऊ नका, मी एकदा राजकारणात घुसलो तर परिणामाची चिंता करत नाही, असे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील म्हणाले होते.

### शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या

विद्युत तारांमुळे बाधित होणाऱ्या शेतीची नुकसान भरपाई कंपनीने निश्चित केलेली नाही. त्यामुळे ही भरपाई देण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच, कंपनीकडून यापूर्वी शेतकऱ्यांना मोबदल्यापोटी चेक दिलेले आहेत, त्यापैकी अनेक चेक बाऊन्स झालेले असून ही एकप्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भरपाई मिळत नाही, तोपर्यंत काम थांबविण्यात यावे. कंपन्यांबद्दल शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून जिल्हा प्रशासनाने हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे. यावेळी गोलंग्रीचे सरपंच श्रीकांत कवडे, घारगावचे सरपंच बालाजी ढास यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### महायुतीचे टेंशन

जोगेंद्र कवाडे म्हणाले की, आगामी राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये आपल्या पक्षाला एका जागेवर संधी देण्यात यावी. तसेच राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या यादीतही एका जागा मिळावी. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पीपल्स रिपब्लिकन पक्षाला ३३ जागा मिळाव्यात. जरी तेवढ्या जागा मिळाल्या नाहीत तरी किमान ५ जागांसाठी आम्ही आग्रही असणार आहोत.

जोगेंद्र कवाडे म्हणाले की, पीपल्स रिपब्लिकन पक्षाला सत्तेमध्ये एक वाटा मिळाला पाहिजे. महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत भेट झाल्यानंतर ते आमची मागणी मान्य करतील. विधानसभेसाठी आमची ३३ जागांची मागणी आहे. पण किमान पाच जागा तरी मिळतील अशी अपेक्षा आहे.

विनय कोरे यांनी १५ जागा मागितल्या

महायुतीमधील आणखी एक घटकपक्ष असलेल्या जनसुराज्य शक्ती पक्षाचे प्रमुख आमदार विनय कोरे यांनी आपल्याला १५ जागा मिळाव्यात अशी मागणी केली. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले, पन्हाळा-शाहूवाडी, चंदगड आणि करवीर या जागा विनय कोरे यांनी महायुतीकडे मागितल्या आहेत. तसेच सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील एकूण १५ जागांची मागणी विनय कोरे यांनी केली आहे. त्यानंतर आता जोगेंद्र कवाडेंनीही ३३ जागा मागितल्या आहेत.

पान १वरून...

### केसापुरी-ढोरवाडीच्या

माने यांनीही केसापुरी-ढोरवाडीच्या ग्रामपंचायत निवडणुकीत 'अनुसूचित जाती' प्रवर्गासाठी राखीव असलेल्या प्रभाग क्रमांक.२ मधून 'व्होलर-२६' या जातीच्या प्रमाणपत्राआधारे निवडणूक लढवून विजयी झाल्या. परंतु या दोन्ही विजयी झालेल्या उमेदवारांनी नियमानुसार आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता अर्थात पडताळणी समितीकडून मिळविलेले जातवैधता प्रमाणपत्र तब्बल एक वर्ष उलटूनही सादर केले नाही. याप्रकरणी केसापुरी येथील रहिवाशी असलेल्या अनिता नवनाथ काळे यांनी विधिज्ञ दीपक कुलकर्णी यांच्या २ जानेवारी २०२४ मार्फत जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात सरपंच आत्माराम सखाराम माने व सदस्य कालिंदा आत्माराम माने यांना अपात्र करण्यासाठी अपील केले होते. याप्रकरणावर जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयाने ५ ऑगस्ट २०२४ निर्णय देत सरपंच व सदस्य असलेल्या पती-पत्नीला अपात्र ठरवले. अर्जदार अपीलकर्ते यांच्या वतीने विधिज्ञ ॲड.दीपक कुलकर्णी व ॲड.विकास मिसळ यांनी कामकाज पहिले.

### आ. संदीप क्षीरसागर यांना

मिळाला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या तसेच जिल्ह्यातील पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सभा पार पडली. या सभेत बीड मतदारसंघातून विधानसभेसाठी महाविकास आघाडीचे भावी उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांना पुन्हा एकदा आशिर्वाद देऊन मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी द्या असे आवाहन सर्व उपस्थितांनी केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार जेष्ठ नेते अमोल कोल्हे, बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे, पोहरादेवी देवस्थान चे महंत रमेश महाराज, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर, माजी आ.उषाताई दराडे, जेष्ठ नेते ॲड.डी.बी.बागल, सुशीला ताई मोराळे, हेमाताई पिंपळे, राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पूजाताई मोरे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व बीड मतदारसंघातून सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संदीप क्षीरसागरांच्या मागे तुमचा आशीर्वाद असाच राहू द्या- जयंत पाटील

आम्ही शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून आपल्या दारात आलो आहोत. ज्याप्रमाणे गेल्या विधानसभा निवडणुकीत बीड जिल्ह्याने सहापैकी चार जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिल्या होत्या त्याप्रमाणे यावेळीही सहाच्या सहा जागा शरदचंद्र पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला व महाविकास आघाडीला बीड जिल्हा देणार आहे. कारण लोकसभा निवडणुकीत ४०० पार चा नारा देणाऱ्या भाजपाला २४० पार करता करता नाकीनऊ आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे घटना बदलण्याची स्वप्न बाळगणाऱ्यांना भारतीय जनतेने रोख लावण्याचे रोख लावण्याचे काम केले. त्यामध्ये महाराष्ट्रातून महाराष्ट्रातून सर्वात मोठा वाटा बीडचा आहे. परंतु घटना बदलण्याचे स्वप्न अजूनही थांबलेले नाही मुळातच घटना बदलण्याची स्वप्न १९५२ पासून भाजपाचे असून मुंबई आणि महाराष्ट्र त्यांच्या ताब्यातून जोपर्यंत

पान १वरून...

जाणार नाही तोपर्यंत त्यांना देशात धक्का बसणार नाही. ही बाब लक्षात घेऊन उद्याच्या विधानसभा निवडणुकीत घटना बदलण्याचे स्वप्न पाहणाऱ्या व जाती-धर्मांमध्ये वाद लावून आपल्या राजकीय पोळ्या भाजून घेण्याची प्रवृत्ती असलेल्या भाजपला धक्का देण्याचे काम करू. पवार साहेबांच्या विचारांशी आणि आपल्या जनमाणसांशी एकनिष्ठ राहून संदीप क्षीरसागरांसारखा तरुण आपली सेवा करत आहे. निश्चितच आपल्या अपेक्षा खूप सारे असतील परंतु त्यांची पूर्तता करण्यासाठी परिस्थिती अनुकूल नाहीये त्यामुळे येणाऱ्या काळात परिस्थिती आपल्या बाजूने आणावयाची आहे त्यासाठी तुम्ही आता सारखेच येणाऱ्या निवडणुकीतही आमदार संदीप क्षीरसागर यांच्या पाठीमागे रहा. असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

संदीप भैय्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच- खा. अमोल कोल्हे

जशी कामगिरी बीडच्या जनतेने लोकसभेला केली तशीच कामगिरी आता एकनिष्ठ असलेले युवा आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासाठी करावी कारण महाराष्ट्राने आमदार कसे विकत घेतात हे मागील दोन वर्षात पाहिले आहे. आपल्या स्वार्थासाठी सगळेजण आपल्या जनमताशी आणि विचारधारेशी गद्दारी करत असताना बीडमधून एकमेव एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून संदीप क्षीरसागर आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. त्यांनाही प्रलोभने आली होती. सत्तेचे गालिचे अंथरले जात असताना संदीप भैय्यांनाही गद्दारी करून त्यावर चालण्याची संधी मिळवता आली असती. परंतु हा पठ्ठ्या आपल्या विचारांशी आणि आपल्या माणसांच्या भावनांशी एकनिष्ठ राहिला. निश्चितच आपल्या अपेक्षा मोठ्या असतील त्या कदाचित पूर्ण झाल्या नसतील परंतु याचे कारण आपणा सर्वांना ठाऊक आहे की जो कोण आमदार गद्दारी करून सत्तेत सहभागी झाला नाही त्याच्या मतदारसंघात एक रुपयाही निधी न जाऊ देण्यासाठी सत्ताधारी काटेकोरपणे सावध गिरी बाळगत होते. परंतु मतदारसंघाला निधी न दिल्यास त्याचे नुकसान आमदाराला नव्हे तर त्या मतदारसंघाला आणि जनतेला होत असते. हे आपल्याला माहित आहे. विरोधक म्हणतील की, आमदार संदीप क्षीरसागर ने काय केले तर तुम्ही ठामपणे सांगा की होय आमच्या आमदाराने कदाचित काही गोष्टी केल्या नसतील परंतु गद्दारी मात्र मुळीच केली नाही. मी संदीप क्षीरसागर यांच्या वतीने तुम्हाला शब्द देतो की येणारा काळ आपलाच असेल आणि त्यात आपल्या सामान्य जनतेचे सर्व प्रश्न मार्गी लागतील. त्यासाठी पुन्हा एकदा आपल्या या तरुण आणि एकनिष्ठ असलेल्या संदीप भैयांना आशीर्वाद द्या असे आवाहन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी यावेळी केले.

### महाराष्ट्र विधानसभेची

दिवशी मतदान होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. परंतु मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी याबद्दल पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण दिले. कुमार म्हणाले, ''२०१९ साली जम्मू आणि काश्मीरची निवडणूक झाली नव्हती. यंदा मात्र तिथे निवडणूक होत आहे. तसेच महाराष्ट्रात पाऊसकाळ सुरू आहे आणि सणांचा सीझनही सुरू होणार आहे. महाराष्ट्रामध्ये निवडणूक घेण्यासाठीची आयोगाची तयारीही पूर्ण झालेली नाही.'' असे कुमार म्हणाले. त्यामुळे महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक दोन आठवडे लांबणीवर पडण्याची चर्चा आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये २०१४ मध्ये निवडणूक झाली होती. त्यानंतर यंदा निवडणूक होत आहे. अलीकडेच ९ ऑगस्ट रोजी मुख्य निवडणूक आयोगाने जम्मू आणि काश्मीरचा दौरा केला होता. त्यानंतर

पान १वरून...

लवकरच निवडणुका होणार असल्याचे स्पष्ट दिले होते. तर ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत जम्मू आणि काश्मीरच्या निवडणुका घेण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. त्यामुळे शुक्रवारी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकी तारखेची घोषणा केली जाईल, अशी चर्चा होती. परंतु निवडणूक आयोगाने हरियाणा जम्मू काश्मीर या दोनच राज्यात निवडणूकीची घोषणा केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लांबणीवर आहे.

### लोकशाहीला अजूनही धोका

ही सभा आहे. महाराष्ट्राचा विचार करावा लागेल. मात्र, देशावरचे संकट अद्याप गेलेले नाही. लोकसभेला आपण संविधान बदलण्याबाबत भूमिका मांडली होती. संविधानावरील संकट अजूनही गेलेले नाही. कारण आत्तोचे सरकार आहे. त्यांची जी विचारधारा आहे, त्यांना संविधानाची अडचण असल्याची टीका पवार यांनी यावेळी केली. ते पुढे म्हणाले की, नुकत्याच झालेल्या अधिवेशनात पंतप्रधान एक दिवसही सभागृहात आले नाहीत. १५ ऑगस्टच्या सोहळ्यात विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांना मागे बसवले होते. मी विरोधी पक्षनेता होतो त्यावेळी माझी आसनव्यवस्था ही कॅबिनेट मंत्री यांच्या ओळीत होती. आज राहूल गांधी यांची प्रतिष्ठा गेली असे त्यांना वाटत असेल तर ते चुकीचे आहे. कारण विरोधी पक्षानेत्यांच्या पदाची गरिमा आहे. तिचा प्रश्न निर्माण झाला आहे. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना सुषमा स्वराज यांना पहिल्या रांगेत बसवले. विरोधी पक्ष नेता ही संस्था असते. तिचा मान ठेवायचा असतो, अशी टीका त्यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केली.

लढाई एकजुटीने लढू

राज्याचे चित्र बदलायचे असेल तर इथले सरकार बदलल्याशिवाय पर्याय नाही. रस्त्यावर आंदोलन करणाऱ्याबाबत एक कायदा आणायचा प्रयत्न आपण सरकारचा हाणून पाडला आहे. कारण या कायद्यामुळे रस्त्यावर आंदोलन करणाऱ्या व्यक्तीला ५ ते ७ वर्ष तुरुंगात टाकण्याचे प्रयोजन हातें. मात्र आपण ते होऊन दिले नाही. आम्ही तिघेही सन्मानाने सर्वांना सामावून घेऊन एक चांगले सरकार पूढे आणू. ही लढाई एकजुटीने लढू, असे शरद पवार यावेळी आघाडीच्या नेत्यांना म्हणाले.

### आरोग्य कर्मचाऱ्यास

कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा हिंसाचार झाल्यास त्याची माहिती वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रमुखांनी तातडीने पोलिसांना देणे बंधनकारक असेल. आरोग्य मंत्रालयाच्या वतीने आरोग्य सेवा महासंचालकांनी जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की, कर्तव्यावर असताना आरोग्य कर्मचाऱ्यांवर कोणतीही घटना घडल्यास त्यास संस्था जबाबदार असेल. याशिवाय ६ तासांच्या आत एफआयआरही दाखल करावा लागणार आहे. तसे न झाल्यास वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रमुखावरही कारवाई होऊ शकते. कोलकाता येथील घटनेच्या निषेधार्थ देशभरात डॉक्टरांचा संप सुरू आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची हमी द्यावी, या मागणीसाठी डॉक्टर आंदोलन करत आहेत. यासाठी कायदा करण्याची मागणी डॉक्टरांनी यापूर्वीच केली होती. या घटनेनंतर या मागणीला जोर आला आहे. यासाठी डॉक्टरांनी केंद्र सरकार आणि आरोग्यमंत्र्यांना पत्रही लिहिले होते. मात्र, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कोणताही कायदा आणण्याबाबत कोणतीही चर्चा झाली नाही. मात्र, केंद्र सरकारकडून एफआयआर दाखल करण्याचसंबंधीचा आदेश जारी करण्यात आला आहे.

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि.१७ ऑगस्ट २०२४






बीड : मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी लंडणवारी पूर्ण करून बीडमध्ये आगमन झाल्यानंतर त्यांचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरसकर, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, संपादक अभिमन्यू घरत, संपादक संजय हांगे, कल्याण कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# संपन्न समृद्ध आणि औद्योगिक दृष्ट्या अव्वल बीड जिल्हा घडवू या- धनंजय मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

येणाऱ्या काळात पायाभूत सुविधांनी समृद्ध कृषीसंपन्न आणि औद्योगिक दृष्ट्या राज्यात अव्वल असा बीड जिल्हा घडवू या, असे आवाहन कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज केले

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पालकमंत्री यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ तसेच जिल्हा परिषद प्रशासक व मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता डी. पाटील वक्फ बोर्डाचे अध्यक्ष काझी समीर आदींसह सर्व कार्यालय प्रमुख अधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी लोकाभिमुख योजनांची आखणी आणि अंमलबजावणी राज्यात सुरू आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले. राज्यातील प्रत्येक शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी महिला तसेच युवकानं पर्यंत विकासाचा लाभ पोहोचत आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की राज्यातील २ कोटीहुन अधिक बहिणींना दरमहा १५०० रुपये अर्थसहाय्य मिळवून देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' ही महत्वाकांक्षी योजना शासनाने सुरू केली असून पहिल्या २ महिन्यांचे प्रत्येकी ३ हजार रुपये अर्थसहाय्य थेट या बहिणींच्या खात्यात राखीपौर्णिमेपर्यंत मिळणार आहेत. आपल्या बीड जिल्हयात ३ लाख ४५ हजार भगिनी आतापर्यंत पात्र ठरलेल्या आहेत. केंद्र शासनाची उज्वला योजना आणि लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी भगिनींना प्रतिवर्षी ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याची 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना' देखील राज्य सरकारने सुरू केली आहे. असेही त्यांनी सांगितले

दि. १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेला प्रत्येक मुलीच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी योजना' राज्य शासन राबवित आहे. या अंतर्गत आपल्या जिल्ह्यात ८७३ लाभार्थीना ४३ लाख ७५ हजार रुपये इतका लाभ शासनाने दिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

गेल्या वर्षी खरिप हंगामापासून १ रुपयात पीक विमा योजना सुरु करण्यात आली. बीड जिल्ह्यात २०२३-२०२४ च्या खरीप व रब्बी हंगामात मिळून ४०० कोटी २४ लाख रुपये पीकविमा मंजूर करण्यात आला असून यापैकी आतापर्यंत सुमारे ३७९ कोटी रुपयांचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आले असून, उर्वरित २१ कोटी रुपये वितरित करणे सुरू आहे. याशिवाय विमा कंपनीने कोणतेही कारण न देता नाकारलेले



विमा प्रस्ताव मंजूर करून त्याही शेतकऱ्यांना येत्या काही दिवसात पीकविमा मिळणार आहे. चालू हंगामात खरिप पिकासाठी १७ लाख १४ हजार विमा अर्ज सादर करून लाखो शेतकऱ्यांनी याही वर्षी एक रुपयात पीकविमा योजनेत सहभाग घेतला आहे.असे सांगून पालकमंत्री श्री मुंडे म्हणाले की वेळोवेळी होणारी अतिवृष्टी, वादळ वारा, दुष्काळ या नैसर्गिक आपत्तींच्या भरपाईपोटी गेल्या २ वर्षात ७ लाख २१ हजार ६०७ शेतक-यांना ५९३ कोटींहून अधिक रकमेची भरपाई थेट त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

थेट लाभाच्या योजना शेतकरी वर्गाचे उत्पन्न वाढावे यासाठी थेट लाभाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेसोबतच राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत चालू आर्थिक वर्षात जिल्हयातील ३ लाख ८९ हजार शेतक-यांना १०८ कोटी १४ लाख रुपयांचा लाभ शासनाने दिला असून थेट लाभाचाच एक भाग म्हणून शेतीतील वीज बिलात सवलत म्हणून मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना सरकारने जाहीर केली आहे. या योजनेमुळे ७.५(साडेसात) एच पी पर्यंतच्या कृषीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करण्यास निश्चितच मदत होणार आहे. २०२९ पर्यंत ही योजना राबवली जाणार आहे असे पालकमंत्री यावेळी म्हणाले. यंदा चांगल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना उत्पादन वाढीची संधी आहे याच भूमिकेतून जिल्ह्यात या खरिप हंगामात ३ पट अधिक खताची उपलब्धता करून देण्यात आली अस सांगून श्री मुंडे म्हणाले की दिवसेंदिवस यांत्रिकीकरण वाढत आहे यांचा लाभ शेतक-यांना मिळावा यासाठी जिल्हयातील ३९८ शेतक-यांना २ कोटींहून अधिक रकमेच्या कृषी यांत्रिकी साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. सेंद्रीय शेतीचेही महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या परंपरागत कृषी विभाग कार्यक्रमात आपला जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर असून सध्या एक हजार हेक्टर क्षेत्र सेंद्रीय शेतीखाली आणण्याचे काम सुरु आहे. तसेच राज्य शासनाच्या डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत येत्या ३ वर्षात २१ हजार हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणले जाणार आहे.

कृषी व पशु प्रर्दशनी

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी संदर्भातील नवे तंत्रज्ञान आणि यंत्र सामुग्री, नवनवीन शोध, शेतीतील आधुनिक व शास्त्रोक्त माहिती मिळावी तसेच नवनवीन उपकरणे, इत्यादी खरेदी करणे शक्य व्हावे सोबतच पशु पालनातील नवे तंत्र व उपलब्धता यासाठी येत्या २१ ऑगस्टपासून परळी येथे भव्य असे राज्यस्तरीय ५ दिवसीय कृषी व पशु पालन प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. याचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक शेतकरी व शेतीशी संबंधित प्रत्येक व्यक्तीने घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सध्या राज्यात महसूल पंधरवडा सुरू आहे. यानिमित्ताने महसूल विभागाच्या माध्यमातून आपले काम चोखपणे पार पाडणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. महसूल विभागाकडून करण्यात येणारी ई-पीक पाहणी महत्वाची आहे. यात ग्रामीण भागातील सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन मी करतो.असे सांगून पालकमंत्री श्री मुंडे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की,नुकतेच कृषी विभागाने मागील वर्षी सोयाबीन व कापसाचे भाव पडल्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. यासाठी कृषी विभागाने निधी उपलब्ध करून दिला असून, ई-पीक पेऱ्याची नोंद असणारे सर्व सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकरी यासाठी पात्र आहेत.

## फुलसांगवी शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील फुलसांगवी येथील जि.प. केंद्र माध्यमिक शाळेत ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्सहात साजरा करण्यात आला असून, यावेळी मुख्याध्यापक सावंतसर यांच्या हस्ते ध्वजरोहन करण्यात आले होते.

शिरूर कासार तालुक्यातील जि.प. केंद्र माध्यमिक शाळा फुलसांगवी येथे शाळेमध्ये विविध महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी, याच बरोबर राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी विविध उपक्रम ही राबवले जातात. यावर्षीचा भारताचा ७८



वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी विविध स्वागत गीत, देश भक्ती गीत गाऊन मान्यवरांची मने जिकली होती.मान्यवरांनी आपली मनोगत व्यक्त करून देशाप्रती भावना व्यक्त केल्या यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सावंत सर, सरपंच सौ. संगीता भास्कर सानप, जेष्ठ नागरिक सखाराम तळेकर, ग्रामपंचायतचे मार्गदर्शक भास्करराव सानप (माजी सरपंच ) ग्रामसेवक सानप साहेब,हौसराव जायभाये, वसंतराव सोनवणे, अशोक भाऊराव तळेकर, दिलीप तळेकर उपसरपंच आदिनाथ तळेकर,ग्रामपंचायत सदस्य हनुमंत सोनवणे, जनार्दन लोणके आदी मान्यवरासह प्राथमिक आरोग्य केंद्राचे इंगोले साहेब, आरोग्य सेविका, आशा त्याच बरोबर शाळेतील शिवाजी जाधव सर, शिलाताई सोनवणे, वारे सर, सोनवणे सर, उरणकर सर, घुगे सर गाडेकर सर, सर्व शिक्षकेतर कर्मचारी, शालेय व्यवस्थापन समिती उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस सभारंभ पार पडला. कार्यक्रमाचे प्रस्थाविक डोंगरे सर यांनी केले तर सूत्रसंचलन पवार सर यांनी केले होते.

## महाराष्ट्र इंग्लिश स्कूल पिंपळनेर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

पिंपळनेर/प्रतिनिधी

महाराष्ट्र इंग्लिश स्कूल पिंपळनेर या ठिकाणी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला.आजच्या या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मॅनेजर अमित यांची उपस्थिती होती.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून घोगरे सर उपस्थित होते.अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आजच्या १५ ऑगस्ट च्या कार्यक्रमाला पालकांची उपस्थिती होती.आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित विद्यार्थी व सर्व पालक वर्गांना घोगरे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

पुढे ते म्हणाले भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. भगतसिंग ,राजगुरू, सुखदेव यांना देखील प्राण गमवावे लागले.अनेकांनी मिळून हा स्वातंत्र्याचा उठाव यशस्वी केला.आणि दिडशे वर्ष इंग्रज राजवटीतून भारत देशाला मुक्त केले.म्हणून तर आज आपण भयमुक्त जीवन जगत आहोत. पुढे बोलताना उपस्थित पालक वर्ग व विद्यार्थ्यांना त्यांनी मोलाचा संदेश दिला. आधुनिक युगात आपण जरी स्वातंत्र्य




असलो तरी आपले आणि आपल्या पाल्याची स्वातंत्र्य ह्या मोबाईल फोनने हेरावून घेतले आहे. मोबाईलच्या जास्त वापरामुळे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता नष्ट होत चालली आहे.

असाही मोलाचा संदेश त्यांनी दिला.आजच्या कार्यक्रमाला उपस्थित महादेव अंधारे, संतोष म्हेत्रे, जाधव सर आदींची उपस्थिती होती.आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्कूलमध्ये देश रंगीला या देशभक्तीपर गीतावर अतिशय उत्कृष्ट नृत्य सादर केले.आजच्या या कार्यक्रमाच्या दरम्यान स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट भाषणे केली. आणि उपस्थित पालकांची आणि प्रमुख पाहुण्याची मने जिंकली. प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. अशा विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, मेडल आणि सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले.विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवणारे व्यासपीठ म्हणून महाराष्ट्र इंग्लिश स्कूल नाव रूपाला येत आहे. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचाल प्रा.कानतोडे सर यांनी केले.बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन स्कूलचे उपप्राचार्य कदम सर यांनी केले.शेवटी उपस्थितांचे आभार स्कूलचे कर्तव्यदक्ष शिक्षक हाटवटे सर यांनी मानले.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी, जि. जालना**
**नविन प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

फोन ०२४८३-२७८७१७
घनप-२०२४/आस्था-०५/जा.क्र १८६३ दिनांक-१६.०८.२०२४

**जाहिर सूचना**

सर्व पात्र ईच्छुक यांना याद्वारे कळविण्यात येते की, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.९०/व्यशि-३. दि. १ जुलै, २०२४ नुसार मा. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत Data entry Opertor, No-01 शिकाऊ प्रशिक्षणार्थी निवड करणेसाठी नगरपंचायत घनसावंगी मार्फत विहित पोर्टलवर नोंदणी करण्यात आलेली आहे मात्र पोर्टलवर तांत्रिक अडचण येत असल्याने वरिष्ठाच्या निर्देशानुसार ऑफलाईन पध्दतीने खालील तपशिला प्रमाणे अर्ज मागविण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| ०१ | Data entry Opertor | ०१ | १) कोणत्याही शाखेतील पदवी<br>2. MSCIT<br>3 Typing English 40 wpru<br>4 TyPING Marathi 30 wpm | १८ ते ३५ |

तसेच शिकाऊ प्रशिणार्थी निवड करण्यासाठी ईच्छुकांनी वर दर्शविल्याप्रमाणे विहित शैक्षणिक पात्रते संबधीचे आवश्यक कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्र, टकलिखीत केलेले अर्ज व त्यावर पासपोर्ट साईज फोटो चिटकवलेले असावेत व सदर अर्ज दिनांक २१.०८.२०२४ (बुधवार) दुपारी १५.०० वाजेपर्यंत नगरपंचायत घनसावंगी कार्यालयाच्या पत्त्यावर किवा स्वतः दाखल करावेत,विहित मुदती व वेळे नंतर आलेल्या अर्जाचा बियार केला जागार नाही पात्र उमेदवारांना मुलाखतीलसाठी पत्राद्वारे/दुरध्वनीद्वारे कळवण्यात येईल किंवा नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यांत येईल. शिकाऊ प्रशिणार्थी निवड प्रक्रिया व प्रतिमहा विद्यावेतन शासन निर्देशानुसार अनुज्ञेय असेल,

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
घनसावंगी नगरपंचायत

पान ६ वरून...

### माजलगाव हरित करण्याचा

अंतर्गत मुख्य रस्ता रहदारीचा असल्याने आकाश मोगरा व दुबई रिटर्न या सरळ वाढणाऱ्या झाडांची निवड करण्यात आली व पहिल्या टप्प्यात आज ३० झाडांचे वृक्षारोपण करून हरित माजलगाव चा शुभारंभ करण्यात आला लगेचच या झाडांना तिरंगी कलर चे मजबूत ट्रीगार्ड लावण्यात आले आहेत

पुढील नियोजनात छत्रपती संभाजी महाराज चौक ते मौलाना आझाद चौक या शहरातून जाणाऱ्या जाणाऱ्या दोन किमी अंतराच्या मुख्य रस्त्यावर वृक्षारोपण कारण्यात येणार असून यात रोटरी क्लब सह व्यापारी महासंघ पत्रकार संघ विविध शिक्षण संस्था सह नगर परिषद व शासकीय अधिकारी व प्रशासनाचे सहकार्य घेऊन हरित माजलगाव हा प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचे रोटरी चे अध्यक्ष पांडुरंग चांडक व सचिव प्रभाकर शेटे यांनी या प्रसंगी सांगितले.

वृक्षारोपण च्या या कार्यक्रमास

रो. अण्णासाहेब तौर डॉ. रो.सुनील गरड रो.नीलकंठ साबळे इंजि.गजेंद्र खोत रो. इम्रान नाईक समीर शेख डॉ. अशोक घुबडे विजय करवा हनुमान कासट सुदर्शन थावरे इंजि.कृष्णा सोळंके,आनंद शिंदे लक्ष्मण बहिर जगदीश चांडक शेख अली इत्यादि पर्यावरण प्रेमी आवर्जून उपस्थित होते. रोटरी क्लब ३१३२ मध्ये मराठवाड्यातील आठ जिल्ह्यासह नगर सातारा सोलापूर या ११ जिल्ह्यातील क्लब कडून रोटरी चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो.सुरेश साबू यांचे नेतृत्वाखाली सन २०२४/२५ या वर्षात ५ लक्ष झाडे लावण्याचा संकल्प असून पावसाळ्यातील तीन महिने वृक्षारोपण यज्ञ चालू असणार आहे.

### सरकारच्या भुलभूलैय्या योजनेमुळे

या योजनेपासून वंचित आहेत, आणि तुमचं सरकार रोज एक नवीन योजना काढत आहे, आता लोक म्हणू लागलेत आम्ही भोळी भाबडी लोक होतो, परंतु आता आम्ही हुशार झालोत. त्यामुळे आपण हे सोंग बंद करावे, अन्यथा जे काय थोडेफार आमदार निवडून येणार आहेत, ते ही निवडून देणार नाहीत, अशी मतदारांची भावना झाली असून आपले निवडून येणारे आमदारांचा आकडा कमी होईल अशी चर्चा सर्वसामान्य जनतेमध्ये आहे. दरम्यान महायुती सरकारने पुन्हा नव्याने युवती व महिला मतदारांना खुश करण्यासाठी त्यांच्या मतावर सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न पाहत लाडकी बहीण योजना आणली व त्यांच्या खात्यात पैसे आपण टाकाल किंवा टाकले ही असतील पण जनतेचे सांगणे एवढेच आहे की योजना चांगली आहे, परंतु राबवताना ती पूर्ण राबवत जा. फक्त मतापुरता योजनेचा व जनतेच्या मताचा वापर करू नका, जनतेच्या तोंडाला पान पुसण्याचे काम करू नका, गोरगरिबांना गाजर दाखवू नका, जर का तुम्ही गोरगरिब माता-भगिनींना युवती लाडकी बहीण व विविध योजना दाखवून मत मिळवत असताल आणि निवडणूक झाल्यानंतर योजनेकडे लक्ष देणार नसाल तर जनता तुम्हाला खुर्ची वरून खाली खेचल्याशिवाय राहणार नाही. तरी आपण अंमलबजावणी केलेल्या योजनेचे पैसे लाभार्थ्यांना तात्काळ द्यावे, नसता तुमच्या भुलभूलैय्या योजनेमुळे कर्जबाजारी होणाऱ्या मतदार जनतेचा तळतळाट तुम्हाला लागल्याशिवाय राहणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि मंजूर लाभार्थी यांचे अनुदान तात्काळ वितरित करावे, अशी मागणी शेवटी मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी केली आहे.

### वकील संघाच्या अध्यक्षपदी

यावेळी ‘‘इतर कोणत्याही वकील संघात यावर्षी मतदान केले नाही‘‘ अशा प्रकारचे एक घोषणापत्र तर ए.आय.बी.इ. परीक्षा पास झाल्या संदर्भातील दुसरे घोषणापत्र मतदारांकडून भरून घेण्यात आले. त्यामुळे ॲड. अजित एम देशमुख यांनी दिलेल्या निर्णयाचे पालन झाले. जिल्ह्यात पहिल्यांदाच अशा पद्धतीने निवडणूक होत असताना निवडणूक निर्णय अधिकारी ॲड किर्दत यांनी चोख कामगिरी बजावल्यामुळे वकील संघाच्या सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

या सर्व गडबडीत अन्य तालुक्यातील कोणीही बीडमध्ये मतदान टाकण्यासाठी आले नाही. परीक्षा पास नसलेले देखील मतदान करू शकले नाहीत. म्हणून ७८० सदस्यांची मतदार यादी असताना ११० मतदान कमी झाले. मतदान कमी होण्याचा हा वकील संघाच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग आहे. हा आदर्श जिल्ह्यातील इतर वकील संघ तर घेतीलच पण महाराष्ट्र राज्यात देखील पोहोचेल, असे तत्कालीन निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

### विद्यमान आमदारांनी फक्त

घावटे,सुनील देशमुख,सय्यद अन्सार, राम मधूरकर,रतिलाल

पान ६ वरून...

कटारिया,अशोक ढवन,काकासाहेब थेटे,संजय आजबे,कुमार जाचक,छगन कर्डीले,भाऊसाहेब भोजने,रमेश भोजणे,योगेश भंडारी,बिपीन भंडारी,जयंत खंदारे,गोविंद मिश्रा,अशोक राजपूत,गोरख कर्डीले,नागेश कर्डीले,संपत कर्डीले,दीपक कर्डीले,महेश कराळे,सतीश कर्डीले,बंडू सय्यद,राजाबपू कर्डीले,सागर खेडकर,दासा शिरोळे,संतोष भंडारी,राजू गावडे,विजय वेदपाठक,संतोष ओव्हाळ,सुभाष ढोबळे,राम धुमाळ,शैलेश गांधी,सुभाष घावटे,रमेश देशमुख,महेश घोलप,ऋषिकेश कर्डीले,परमेश्वर कर्डीले,महेश खाकाळ,अशोक पवळ डोंगरगण गणातील एम.डी.हरिभाऊ मार्कंडे,माजी.जि.प.सदस्य रामहरी महारनोर,भाऊसाहेब गोंदकर साहेब, गणप्रमुख बिट्टू पोपळे,राजेंद्र दहातोंडे,रमेश गावडे,सरपंच संदीप मार्कंडे, महादेव मोरे,गण प्रमुख रामेश्वर चव्हाण,चेअरमन अशोक मुळे, अँड.काकासाहेब देसाई,बाबासाहेब चांगण, माजी उपसभापती शिवाजी अनारसे,महादेव मोरे,सरपंच शिवाजी बुरुंगुले,माजी सरपंच सुनील जगताप,माजी सरपंच दत्ता चव्हाण, शरद काका देसाई,अन्सार शेख,चेअरमन भगवान पाचे,शाकिर शेख सुरुडी गणातील

एन टी. गर्जे ,रामभाऊ सारूक मामा,चेअरमन लक्ष्मण ननवरे,सुंदरलाल गर्जे,सरपंच विकास पवार,सरपंच रभाजी गर्जे, शेषराव गर्जे,बाळू गर्जे,माजी सरपंच अजिनाथ शेकडे,उपसरपंच बबन पुढारी तरटे,अश्रूबा गोल्हार, गणप्रमुख धनंजय तरटे,निवृत्ती दादा,नवनाथ आबा तरटे,उपसरपंच मच्छिंद्र वायभासे,राजेंद्र धस,त्रिंबक तोतरे,नवनाथ तोतरे,चेअरमन कारभारी गर्जे,बाबू भैय्या गर्जे,इंद्रजित गर्जे,वसंत मिसाळ, शंकर मिसाळ म्हतारदेव शेंडे,वैभव गोल्हार,बाळासाहेब वनवे,विठ्ठल गर्जे,रमेश खलाटे,शंकर मिसाळ,नितीन नाकाडे,अशोक दहिफळे, आनंद गावडे,लक्ष्मण गर्जे,मुरलीधर गर्जे,राहुल साबळे,अशोक दहिफळे,राहुल डोळे,लक्ष्मण खाडे, वासुदेव सानप, बद्रीनाथ गर्जे, बबन गावडे, मारुती डिसले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते,युवक,नागरिक मोठ्या उपस्थित होते.

माजीमंत्री सुरेश धस यांच्यावर विश्वास दाखवत त्यांच्या गटात कडा येथील धोंडे गटाचे शेख इब्राहिम रज्जाक,ग्रामपंचायत सदस्य छगन कर्डीले तर सुरुडी गणातील धोंडे गटातील नागतळा खडकवाडी उपसरपंच मच्छिंद्र वायभासे,ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र धस,ग्रामपंचायत सदस्य अनिल गावडे या कार्यकर्त्यांनी धोंडे गटातून प्रवेश केला

### उमापूरचे ग्रामीण रुग्णालय गरजू

केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉक्टर भारतीताई पवार यांना निवेदन देऊन उमापूर येथील ग्रामीण रुग्णालय, जातेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व धोंडराई येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामासाठी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी निधीची मागणी केली. भारतीताई पवार यांचे ए पी एस तथा आयुष्यमान भारत योजना महाराष्ट्र राज्याचे प्रमुख ओमप्रकाशजी शेटे यांच्या माध्यमातून वेळोवेळी पाठपुरावा केला. आज त्या पाठपुराव्याला यश आले असून पहिल्या टप्प्यात उमापूर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी तब्बल ०७ कोटी ८८ लक्ष ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला व १२ / ०८ / २०२४ रोजी सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

धोंडराई येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व जातेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतनीकरणासाठी पाठपुरावा सुरू असून उमापूर ग्रामीण रुग्णालयासाठी देखील अधिकचा ( उर्वरित ) निधी उपलब्ध व्हावा यासाठी पाठपुरावा सुरू आहे. येणाऱ्या काळात त्याही प्रयत्नांना यश मिळेल अशी अपेक्षा देखील आमदार पवार यांनी व्यक्त केली.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात शेवटी आमदार पवार म्हणाले की चकलांबा जिल्हा परिषद गट व उमापूर जिल्हा परिषद गट तसेच मादळमोही व धोंडराई जिल्हा परिषद गटातील काही गावांच्या गरीब गरजू रुग्णांना उपजिल्हा रुग्णालय गेवराई हे दूर पडत होते तसेच गैरसोयीचे देखील वाटत होते. उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे मिळणाऱ्या सर्व आरोग्याच्या सुविधा येणाऱ्या काळात ग्रामीण रुग्णालय उमापूर येथे उपलब्ध होतील. रुग्णालयातील डॉक्टरांची व कर्मचाऱ्यांची संख्या वाढेल यामुळे रुग्णांची हेळसांड होणार नाही. हे ग्रामीण रुग्णालय उमापूर पंचक्रोशीतील गरीब गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल अशी भावना देखील आमदार लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केली.

### दिंद्रुड येथे बाजार तळ

न्याय मिळत नसल्याने ग्रामस्थांच्या वतीने संजय शिंदे, बाबा कांबळे, सुखदेव कटारे, प्रशांत कुलकर्णी, राम उबाळे, रंगनाथ सोळंके यांच्यासह अनेक नागरिकांनी स्वातंत्र्यदिनी (गुरुवारी) येथील जुन्या बस स्थानक परिसरात उपोषण सुरू केले आहे. माजलगाव तहसीलदार यांनी येथील चालू उपोषणास स्वातंत्र्यदिनी सायं. सहा वाजता उपोषणकर्त्यांना भेट दिली. मात्र समाधान न झाल्याने उपोषण सोडवण्यात तहसीलदार यांना यश आले नाही. या वादावर महसूल प्रशासनाने तात्काळ निकाल द्यावा या मागणीसाठी येथील सर्व व्यापाऱ्यांनी शुक्रवारी उपोषणाला पाठिंबा देत बाजारपेठ कडकडीत बंद ठेवली. जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी दिंद्रुड पोलीस स्टेशनला भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला असून बीड जिल्हाधिकारी यांना तात्काळ अहवाल पाठवत दिंद्रुड येथील बाजार तळाच्या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा काढण्यात येईल, नागरिकांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी कुठलीही गोष्ट करू नये असे आश्वासन माध्यमाद्वारे ग्रामस्थांना केले आहे.

cmyk

# राज्यात सरासरीपेक्षा २९ टक्के अधिक पाऊस

## १५ ऑगस्टनंतर पुन्हा पावसाचा जोर वाढणार, वाचा हवामान विभागाचा अंदाज

सध्या राज्यात पावसाचा जोर कमी झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. राज्यातील बहुतांश भागात चांगला पाऊस झाला आहे. नदी, नाले धरणांच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, राज्यात आत्तापर्यंत सरासरीपेक्षा २९ टक्के पाऊस अधिक झाला आहे. तर १५ ऑगस्टनंतर राज्यातर पुन्हा पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

महिनाअखेरपर्यंत पावसाचा जोर वाढणार

सध्या जरी राज्यात पावसाचा जोर कमी झाला असला तरी उद्यापासून म्हणजे १५ ऑगस्टपासून पुन्हा राज्यात पावसाचा जोर वाढू शकतो असं हवामान विभागानं सांगितलं आहे. २२ ऑगस्टपर्यंत हळूहळू पावसात वाढ होण्याची शक्यता आहे. ही वाढ महिना अखेरपर्यंत चालू राहील अशी माहिती देखील हवामान विभागानं दिली आहे. राज्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा २९ टक्के पाऊस अधिक झाल्यानं शेतकरी समाधानी झाले आहेत. तर जादा पावसामुळे काही ठिकाणी शेतकरी अडचणीत देखील आले आहेत. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आज राज्यात कुठेही पावसाची शक्यता नाही. काही भागात ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.



चांगल्या पावसामुळं धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ

पुणे विभागातील बहुतांश धरणे आता भरत आली असून भाटघर, वीर आणि उजनी धरण १००% ने भरले आहे. निरा देवघर धरणात ९७.२०%, चाकसमान ९९.०२%, पवना ९५.२७%, खडकवासला ८१.४३%, पानशेत ९९.१३%, डिंभे ८३.७९ टक्क्यांनी भरले आहे. सध्या या सर्व धरणांमधून विसर्ग सुरू असून मुळा,मुठा, भीमा, मीरा नदीपात्रात पाण्याची आवक होत आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर मधील धरणांची ही स्थिती सध्या चांगली असून बहुतांश धरणे ८० टक्क्यांच्या पुढे गेली आहेत. कोल्हापूरचा दूधगंगा प्रकल्प ८५.९५ टक्क्यांनी तर राधानगरी ९७.८२ टक्के भरला आहे.

## गाय, म्हैस गाभण राहण्यासाठी खाऊ घाला 'हा' पौष्टिक लाडू



गाय, म्हैस यांच्या गर्भधारणासाठी पौष्टिक आहार महत्त्वाचा असतो. अनेक पशुपालक शेतकरी गाय, म्हैस गाभण राहत नसल्याची तक्रार करतात. परंतु बहुतेक पशुपालकांना जनावर गाभण राहण्यासाठी कोणता आहार खाऊ घालावा याबद्दल माहिती नसते. परंतु पशुपालकांच्या या समस्येवर उपाय शोधण्यात आलेला आहे.

भारतीय प्राणी संशोधन संस्थेने गेल्या वर्षी म्हणजेच २०२३ मध्ये जनावरांसाठी पोषक लाडू तयार केलेत. या लाडू मध्ये शास्त्रज्ञांनी असे काही पोषक घटक टाकले आहेत, ज्यामुळे गाय असो किंवा म्हैस त्यांची गर्भधारणेची क्षमता सुधारते. तसेच शास्त्रज्ञांनी हा लाडू पूर्णपणे आयुर्वेदिक असल्याचे म्हटले आहे. शास्त्रज्ञांनी सांगितल्याप्रमाणे, मोलॅसिस, कोंडा, नॉन-प्रोटीन नायट्रोजन, खनिज मिश्रण आणि मीठ या पदार्थांच्या मिश्रणातून हा पौष्टिक लाडू जनावरांसाठी तयार करण्यात आला आहे. हा २५० ग्रॅम चा एक लाडू बनवण्यासाठी फक्त २० रुपयांचा खर्च येतो हे विशेष. जर पशुपालकांना हा लाडू बनवायचा असेल तर ते भारतीय प्राणी संशोधन संस्थेकडून याची ट्रेनिंग घेऊ शकतात. जर गाय किंवा म्हैस गाभण राहत नसेल तर अशा जनावरांना हा लाडू सलग २० दिवस खाऊ घातल्यास गर्भधारणेची समस्या समूळ नष्ट होऊ शकते. अवघ्या एका महिन्याच्या काळातच या लाडूमुळे शंभर टक्के रिझल्ट पाहायला मिळणार आहेत.या लाडूमुळे गाय, म्हैस गाभण तर राहणारच आहे. शिवाय यामुळे दुग्ध उत्पादनक्षमता देखील वाढत असल्याचा दावा या संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी यावेळी केला आहे.

## कर्जमुक्ती योजनेतील प्रोत्साहनपर अनुदानासाठी केवायसी करा

### सहकार विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन

पुणे : राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या काळात महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबवण्यात आली. या योजने अंतर्गत १४ लाख ३८ हजार शेतकऱ्यांना ५ हजार २१६ कोटी ७५ लाख रुपये वितरित केले गेले. पण ३३ हजार ३५६ कर्जखात्यांचं आधार प्रमाणीकरण झालेलं नसल्यानं या ३३ हजार ३५६ खातेदारांना लाभ मिळाला नाही. त्यामुळं अशा पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरण म्हणजेच केवायसी करून घेण्याचं आवाहन सहकार विभागाने केलेलं आहे. त्यासोबतच शेतकऱ्यांना याबाबतची माहिती देण्याचे निर्देशही दिले आहेत.

पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन ५० हजार रुपये लाभ देण्याचा निर्णय सहकार विभागाने २९ जुलै २०२२ रोजी घेतला. त्याचा शासन निर्णय काढला. आजपर्यंत या योजनेतील लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने ५ हजार २१६ कोटी ७५ लाख रुपये वाटप करण्यात आले. या योजनेअंतर्गत राज्यातील विविध बँकांनी एकूण २९ लाख २ हजार कर्ज खात्यांची माहिती योजनेच्या पोर्टलवर सादर केली. त्यापैकी ४ लाख ९० हजार कर्जखाती आयकर दाते, पगारदार व्यक्ती असल्याने अपात्र ठरली. तर साधारणत: ८ लाख ४९ हजार कर्जखाती पीक कर्जाची तीन आर्थिक वर्षापैकी केवळ एकाच आर्थिक वर्षात परतफेड केल्यामुळे अपात्र ठरली होती. पात्र ठरलेल्या १५ लाख ४४ हजार कर्जखात्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आला. त्यापैकी १५ लाख १६ हजार कर्ज खात्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात आले. प्रमाणीकरण झालेल्या कर्जखात्यापैकी १४




लाख ४० हजार कर्जखात्यांसाठी ५ हजार २२२ कोटी ५ लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली. त्यापैकी १४ लाख ३८ हजार खातेदारांना ५ हजार २१६ कोटी ७५ लाख रुपये रकमेचे वितरणही करण्यात आले आहे. उर्वरित ३३ हजार ३५६ कर्ज खात्यांचे आधार प्रमाणीकरण झाले नसल्यामुळे त्यांना लाभ मिळालेला नाही.


अशा शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करून घेतल्यानंतर त्यांना लाभ देण्यात येणार आहे. संबंधित खातेदारांना बँकांनी त्याबाबत सूचना करावी, असेही निर्देश सहकार विभागाने दिले आहेत. पात्र असून केवळ आधारचं प्रमाणीकरण न केलेल्या शेतकऱ्यांनी आधारचं केवायसी करून घ्यावं. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलं तर शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ मिळणार आहे. म्हणजे प्रोत्साहनपर ५० हजार रुपये लाभ शेतकऱ्यांना घेता येणार आहे. त्यासाठी तुमच्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जायचं आहे. आणि तिथून आधारची केवायसी करून घ्यायची आहे. लक्षात घ्या या योजनेची अंमलबजावणी महाआयटीकडून करण्यात आलेल्या संगणकीय प्रणाली मार्फत केली जात आहे. त्यामुळं पात्र अनुदानाची रक्कम लाभार्थींची म्हणजेच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा करण्यात येणार आहेत. त्यामुळं तत्काळ या योजनेसाठी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करून घ्यावं, असं आवाहन सहकार विभागाने केलं आहे.

## पीक पोषणासाठी नवे पर्याय कोणते आहेत?

खतांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ आणि शाश्वत शेती उत्पादनासाठी पीक पोषणाच्या नवीन पर्यायांचा तसेच विशेष खतांचा वापर होणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने नॅनो युरिया, नॅनो डीएपी, सल्फर-लेपित युरिया, पॉली फोर आणि पीडीएम खताचा समावेश होतो.

पिकांच्या वाढीसाठी संतुलित प्रमाणात अन्नद्रव्यांचा वापर महत्त्वाचा आहे. आपल्या देशातील ५० टक्के जमिनीत नत्राची कमतरता आहे. युरियाच्या वापराचे परिणाम शेतकऱ्यांना पिकावर जलद व ठळकपणे दिसतात. नत्र हे मुख्य अन्नद्रव्य असून पिकातील हरित लवकाचा भाग असून, प्रकाश संश्लेषण क्रियेमध्ये महत्त्वाचे कार्य करते. त्यामुळे पिकांची वाढ झपाट्याने होत असते. त्यामुळे युरियाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. पण युरियाची कार्यक्षमता फक्त ३० ते ४० टक्के इतकीच असते. ६० ते ७० टक्के युरिया वाया जातो आणि वाया जाणारा युरिया जमीन, पाणी व हवामान यांना प्रदूषित करतो. त्याचबरोबर युरियावरती होणारा खर्च सुद्धा वाया जातो आणि आर्थिक नुकसान होते. अतिरिक्त वाया जाणारा युरिया जर जमिनीमध्ये राहिला तर जमिनीतील इतर अन्नद्रव्ये, जमिनीचा सामू व सूक्ष्म जीवजंतूंवर त्याचा अनिष्ट परिणाम करतो. त्याचा जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो. जर युरिया पाण्यामध्ये वाहून गेला तर पाण्यातील नायट्रेटचे प्रमाण वाढवून पाणी प्रदूषित होते. त्याचबरोबर काही युरिया हवेमध्ये अमोनिया व नायट्रस ऑक्साइडच्या स्वरूपात उडून जातो. त्यामुळे हवामान प्रदूषित होते.

युरिया खताच्या अतिवापरामुळे पिकांची फक्त शाखीय वाढ होते, पिकांमध्ये लुसलुशीतपणा वाढतो त्यामुळे पीक रोग, किडीला बळी पडते. नाजूकपणा वाढल्यामुळे पीक लोळते. युरियाच्या बरोबरीने डीएपी खताचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. डीएपी किंवा संयुक्त खतातील स्फुरदाची कार्यक्षमता ही



अतिशय कमी आहे त्यामुळे अतिरिक्त स्फुरदचा वापर नैसर्गिक स्रोतांना घातक असतो. या सर्व बाबींचा विचार करता खतांची कार्यक्षमता वाढवणे आणि शाश्वत शेती उत्पादनासाठी पीक पोषणाच्या नवीन पर्यायांचा तसेच विशेष खतांचा वापर आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने नॅनो युरिया, नॅनो डीएपी, सल्फर-लेपित युरिया, पॉली फोर आणि पीडीएम खताचा समावेश होतो.

नॅनो युरिया : १) नॅनो युरियामध्ये नत्राच्या कणाचा आकार हा २० ते ५० नॅनोमीटर इतका असतो. नॅनो युरियामध्ये नत्राचे प्रमाण हे वजनाच्या ४ टक्के असते. त्यामुळे पीकवाढीच्या मुख्य अवस्थेमध्ये नॅनो युरियाची फवारणी करून पिकाची नत्राची ५० टक्के गरज भागवता येते. २) नॅनो युरिया २ ते ४ मिलि प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे नॅनो युरियातील नत्राचे शोषण पानावरील पर्णरंध्रांद्वारे पिकाच्या पेशीमध्ये होते. शोषण केलेला नत्र पेशीतील रिक्तिकामध्ये साठवला जातो. पिकाच्या गरजेनुसार अमोनिकल आणि नायट्रेट रूपामध्ये पुरवला जातो. ३) नॅनो कणांचा आकार, त्यांचे पृष्ठभागीय क्षेत्रफळ, पर्णरंध्राद्वारे शोषण, पेशींच्या रिक्तिकामध्ये साठवण आणि गरजेनुसार पुरवठा यामुळे नॅनो युरियाची कार्यक्षमता ८६ टक्क्यांपर्यंत जाते. ४) नॅनो युरिया जमिनीमधून न देता पिकाला फवारणीद्वारे देत असल्यामुळे युरियाचा जमीन आणि पाण्याशी संबंध येत नाही. कार्यक्षमता चांगली असल्यामुळे हवेमध्ये वाया जात नाही. त्यामुळे नॅनो युरिया पर्यावरण पूरक आणि शाश्वत शेतीसाठी पिकांच्या अन्नद्रव्य व्यवस्थापनातील महत्त्वाचा घटक आहे.

नॅनो डीएपी : १) नॅनो डीएपी (द्रवरूप) हे एक नवीन नॅनो खत आहे. यामध्ये नायट्रोजन (८.० टक्के /) आणि फॉस्फरस (१६.० टक्के २५ /) आहे. नॅनो डीएपीच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ ते आकारमानाच्या दृष्टीने फायदा आहे, कारण त्याचा कण आकार १०० नॅनोमीटरपेक्षा कमी आहे. या गुणधर्मामुळे ते बिया/मुळाच्या पृष्ठभागाच्या आत किंवा पानांच्या रंध्रातून आणि वनस्पतींच्या इतर छिद्रातून सहज प्रवेश करू शकतात. २) नॅनो डीएपी (द्रवरूप) मधील नायट्रोजन आणि फॉस्फरसचे नॅनो क्लस्टर बायो-पॉलिमर आणि इतर एक्सिपियंट्ससह कार्य करतात. नॅनो डीएपीची चांगल्या प्रसाराची क्षमता आणि वनस्पती प्रणालीमध्ये एकत्रीकरण केल्याने बियाण्याला अधिक जोमदारपणा येतो. अधिक हरितद्रव्य, प्रकाशसंश्लेषण कार्यक्षमता, चांगली गुणवत्ता आणि पीक उत्पादनात वाढ होते.

सल्फर-लेपित युरिया : १) जमिनीतील सल्फरची कमतरता दूर करण्यासाठी सरकारने सल्फरलेपित युरिया या खतास मान्यता दिली आहे. सल्फरलेपित युरिया इतर प्रकारांपेक्षा अधिक किफायतशीर आणि कार्यक्षम आहे. २) याची नायट्रोजन शोषण कार्यक्षमता ७८ टक्के आहे. या खताचे दीर्घायुष्य वाढवण्यासाठी ह्युमिक ॲसिड मिसळले आहे. यामुळे युरियाचा वापर कमी होईल. ३) याच्या वापरामुळे जमिनीचे आरोग्य सुधारणा, शेतकऱ्यांचा खर्चात बचत, उत्पादन आणि उत्पादकता वाढवणे शक्य आहे. पॉली फोर : १) कोणतीही रासायनिक प्रक्रिया नसलेले आणि उत्पादनादरम्यान कार्बन फूटप्रिंट कमी असलेले पॉली फोर हे सेंद्रिय शेतीसाठी सुयोग्य असून, ते पूर्ण हंगामात पिकांना पोषण देते. हे नैसर्गिकरीत्या घडलेले, कमी क्लोराइड असलेले, अनेक पोषकद्रव्ये असलेले खत असून, पीकवाढीसाठी आवश्यक पोषकद्रव्यांपैकी पोटॅशिअम १४ टक्के, सल्फर १९ टक्के, मॅग्नेशिअम ६ टक्के आणि कॅल्शिअम १७ टक्के ही अत्यावश्यक पोषणद्रव्ये पुरवते.

२) हे पूर्णपणे विद्राव्य खत असून पिकाला नियमितपणे पोषकद्रव्ये पुरवते. जमिनीतून पोषकद्रव्ये ग्रहण करण्याची क्षमता वाढवते. एमओपीच्या तुलनेत पॉली फोर हे गव्हासाठीचे सातत्यपूर्ण उपलब्धता असणारे सल्फेट-सल्फर खत आहे. पॉली फोरमुळे तृणधान्य पिकांचे शेंडे वाकण्यात घट होते. पीडीएम खत : १) पीडीएम खत म्हणजे पोटॅश डेरीव्हड फ्रॉम मोलॅसिस. हे एक एफसीओ मान्यताप्राप्त खत आहे. त्यामध्ये १४.५ टक्के पालाश असतो. २) एमओपी खताची निर्मिती आपल्या देशात होत नाही. हे खत पूर्णपणे आयात केले जाते. सध्या त्याचे दर वाढतच आहेत, अशावेळी साखर कारखान्यातील उपपदार्थ निर्मित मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या राखेपासून हे खत तयार केले जाते. ३) एमओपी खताला एक उत्तम पालाशयुक्त खताचा पर्याय पीडीएम खत होऊ शकते. यामध्ये १४.५ टक्के पालाश आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४१ : जॉन हॅम्प्टन यांनी व्हेनेशियन शैलीच्या खिडकीचे पेटंट केले.
१८८८ : विल्यम बरोज याने बेरजा मारणार्या यंत्राचे पेटंट घेतले.
१९११ : पॅरिसच्या लुव्र या संग्रहालयातुन लिओनार्डो-द-व्हिन्सी याचे 'मोनालिसा' हे जगप्रसिद्ध चित्र चोरीला गेले.
१९१५ : पहिल्या महायुद्धा दरम्यान इटलीने तुर्की विरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९३८ : इटली देशांतील शाळांमध्ये ज्यू शिक्षकांवर बंदी घालण्यात आली.
१९६५ : रोमानियाने संविधान स्वीकारले.
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायद्यास मान्यता मिळाली.
१९८८ : भारत आणि नेपाळ यांच्या सीमेवर आलेल्या तीव्र स्वरूपाच्या भूकंपामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले.
१९९१ : लाटव्हियाने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९३ : मंगळाच्या शोधमोहिमेसाठी पाठवण्यात आलेल्या 'मार्स ऑब्झर्व्हर' या यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६५ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २० जून १८३७)
१७८९ : ऑगस्टिन कॉशी फ्रेन्च गणितज्ञ (मृत्यू: २३ मे १८५७)
१८७१ : गोपाळ कृष्ण देवधर भारत सेवक समाजाचे एक संस्थापक सदस्य, 'सेवासदन' या संस्थेचे शिल्पकार, सहकारी चळवळीचे आद्य समर्थक (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९३५)
१९०५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते बिपीन गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९८१)
१९०७ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. जीवनवंश यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९६५)
१९०९ : नागोराव घन:श्याम तथा 'ना. घ.' देशपांडे कवी (मृत्यू: १० मे २०००)
१९१० : नारायण श्रीधर बेन्द्रे आदिम कलेपासून चिनी चित्रकलेपर्यंत अनेक शैलीविशेष आत्मसात केलेले चित्रकार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९२)
१९१५ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक कादंबरीकार, लघुकथा लेखक, आणि चित्रपट निर्माता इस्मत चुग़ताई यांचा जन्मदिन.
१९२२ : अमेरिकन खजिनदार शोधक आणि मेल फिशर मरीन हेरिटेज म्युझियमचे संस्थापक मेल फिशर यांचा जन्मदिन.
१९२४ : श्रीपाद अच्युत दाभोळकर 'प्रयोग परिवार' या संकल्पनेचे प्रवर्तक, गणितज्ञ आणि जमनालाल बजाज पुरस्काराने गौरवण्यात आलेले कृषीशास्त्रज्ञ (मृत्यू: ३०एप्रिल २००१)
१९२७ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, समाजवादी राजकारणी आणि उत्तरप्रदेश, उडीसा आणि पश्चिम बंगाल राज्याचे माजी राज्यपाल बी. सत्य नारायण रेड्डी यांचा जन्मदिन.
१९३४ : सुधाकरराव नाईक प्रसिद्ध भारतीय राजकारणी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य तसचं, महाराष्ट्र राज्याचे माजी १३ वे मुख्यमंत्री (मृत्यू: १० मे २००१)
१९३९ : बोत्स्वानाचा राष्ट्राध्यक्ष फेस्टस मोगे यांचा जन्म.
१९६१ : व्ही. बी. चन्द्रशेखर भारताचा फिरकी गोलंदाज
१९७१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी आणि अरुणाचल प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री पेमा खांडू यांचा जन्मदिन.
१९७३ : गूगल चे सहसंस्थापक सर्गेइ ब्रिन यांचा जन्म.
१९८१ : कनेक्ट्यू चे सहसंस्थापक कॅमेरॉन विंकल्वॉस यांचा जन्म.
१९८६ : उसेन बोल्ट जमैकाचा धावपटू. यांनी अनेक विश्व विक्रम आपल्या नावे केली आहेत.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३१ : 'गायनाचार्य' पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८७२)
१९४० : लिऑन ट्रॉट्स्की रशियन क्रांतिकारक (जन्म: ७ नोव्हेंबर १८७९)
१९४७ : बुगाटी कंपनी चे संस्थापक इटोर बुगाटी यांचे निधन. (जन्म: १५ सप्टेंबर १८८१)
१९७६ : पांडुरंग सातू नाईक आल्हाददायकता, कल्पकता व वास्तवता ही वैशिष्ट्ये असलेले चित्रपट छायालेखक
१९७७ : प्रेमलीला ठाकरसी एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलगुरू
१९८१ : आचार्य दत्तात्रय बाळकृष्ण तथा 'काकासाहेब' कालेलकर गांधीवादी देशभक्त, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, इतिहासकार, बहुभाषा कोविद, रसिक, सखोल चिंतक, गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू (१९२८), राज्यसभा सदस्य (१९५२ १९५८), अनुसूचित जमातींच्या आयोगाचे अध्यक्ष (१९५३), गुजराथी साहित्यपरिषदेच्या अहमदाबाद अधिवेशनाचे अध्यक्ष (१९५९), हिन्दी विश्वकोश निर्मिती समितीचे सदस्य, साहित्य अकादमी पारितोषिक (१९६६) व फेलोशिप (१९७१) विजेते, पत्रकार व गुजराथी साहित्यिक(जन्म: १ डिसेंबर १८८५ सातारा, महाराष्ट्र)
१९९१ : गोपीनाथ मोहंती ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ओरिया साहित्यिक (जन्म: २० एप्रिल १९१४)
१९९५ : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय-अमेरिकन खगोल वैज्ञानिक व गणिती. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. यांचे काका सी. व्ही. रामन यांनाही भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक (१९३०) मिळाले आहे. भौतिकशास्त्रात नोबेल मिळवणारे हे दोघेच भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. जन्म: १९ आक्टोबर १९१०)
२००० : निर्मला गांधी समाजसेविका, महात्मा गांधींच्या स्नुषा (जन्म:)
२००० : विनायकराव कुलकर्णी स्वातंत्र्यलढ:यातील व गोवा मुक्तीसंग्रामातील प्रमुख सेनानी आणि समाजवादी विचारवंत (जन्म:)
२००१ : मराठी रंगभूमीचा वारकरी म्हणून गौरविले गेलेले शं. ना. तथा दादासाहेब अंधृटकर (जन्म:)
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२००४ : भारतीय उडिया भाषा कवी सच्चिदानंद राऊत यांचे निधन. (जन्म: १३ मे १९१६)
२००६ : बिस्मिला खाँ भारत रत्न, पद्मश्री व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शहनाई वादक (जन्म: १९१६)
२००७ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक लेखिका कुर्रतुलऐन हैदर यांचे निधन.

# वामनदादा कर्डक यांची गीते माणूस घडविणारी - प्रो.डॉ. संजय मोहड

## नालंदा फाउंडेशन बीड आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

बीड । प्रतिनिधी

नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने देण्यात आलेला महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार सन २०२४ प्रोफेसर आणि संगीत विभाग प्रमुख स.भु.कला आणि वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजीनगरचे प्रा.डॉ. संजय मोहड यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, मानपत्र आणि पंचवीस हजार रुपयांचा धनादेश असे होते. याप्रसंगी भीम वाणी, वामन गाणी कार्यक्रमासाठी परभणी येथून आलेल्या प्रसिद्ध गायिका स्वरलक्ष्मी लहाने यांचाही नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा गुरुवार दि १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह,बीड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.पुरस्काराचे हे तिसरे वर्ष होते.या पुरस्कार समारंभास कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा नालंदा फाउंडेशन बीडचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, मेटाचे




महाराष्ट्र सचिव प्राचार्य केशव जोंधळे, जोशाबा प्रतिष्ठानचे सदस्य इंजि.भिमज्ञ वेडे,अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष उत्तम पवार, नगरसेवक राजू जोगदंड, प्रोफेसर डॉ.मनोहर सिरसाट प्रा.राम गायकवाड, प्रियदर्शी धम्म संस्कार संस्थेचे भास्कर सरपते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.संजय मोहड यांना मानपत्र देण्यात आले.या मानपत्राचे लेखन आणि वाचन बलभीम महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर.डॉ.मनोहर सिरसाट यांनी केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रा.डॉ. पांडुरंग सुतार यांनी केले. याप्रसंगी भीम वाणी, वामन गाणी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी प्रा.डॉ. मोहड म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवमुक्तीचा विचार महाकवी वामनदादा कर्डक यांनी जनमानसात रुजविला. त्यांची गीते माणूस घडविणारी आहेत.संगीत ही साधना आहे,या साधनेत वामनदादा खूपच अग्रेसर होते. आंबेडकरी चळवळ गतीमान करण्यात वामनदादांचा वाटा खूप मोठा आहे. वामनदादांची गीते जन्माला आली नसती तर चळवळीत मोठे सांस्कृतिक दारिद्र्य निर्माण झाले असते,असे प्रा.डॉ.संजय मोहड यांनी सांगितले. वामनदादांनी लेखनीने मोठे कर्तृत्व सिद्ध केले. त्यामुळे त्यांच्या प्रेरणेतून अनेक कवी,गायक जन्माला आले. त्यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार लाखमोलाचा आहे,असे ते यावेळी म्हणाले.हा पुरस्कार विनम्रपणे मी स्विकारतो असे म्हणत पुरस्काराची दिली जाणारी पंचवीस हजार रुपये रक्कम धम्मकार्यासाठी कामी यावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणामध्ये प्रा.प्रदिप रोडे यांनी नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने दिला जाणारा महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार फुले-शाहू- आंबेडकर विचारधारेची नाळ जुळलेल्या कवीं आणि गायकांसाठी समर्पित असल्याचे सांगितले. हे तिसरे वर्ष असल्याचे सांगत प्रा.डॉ. संजय मोहड यांनी संगीत क्षेत्रामध्ये आंबेडकरी चळवळीचे केलेले कार्य महत्वपूर्ण असल्याचे सांगितले. तसेच पुढील कार्यासाठी प्रा.डॉ.संजय मोहड यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा.दिपक जमधाडे, प्रा.शरद वंजारे, प्रा.राम गायकवाड, प्रा.डॉ.संजय कांबळे, आयु. शाम माने यांनी केले होते. यावेळी कार्यक्रमासाठी बीड शहरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## थोडक्यात



### केएसपी विद्यालयामध्ये स्वातंत्र्य दिन

बीड : शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्व प्रथम सकाळी ६ वाजता इयत्ता पहिली ते दहावीच्या मुलांची शाळेच्या परिसरातून प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी धर्मगुरू, स्वातंत्र्यवीर, संत, समाज सुधारक, शेतकरी, डॉक्टर, इंजिनियर, वकील अशा विविध वेशभूषा परिधान करून प्रभात फेरीमध्ये सहभागी झाले होते. लहान मुलांचे हे रूप पाहून सर्वांनी त्यांचे कौतुक केले. मुलांनी आपापल्या हातामध्ये स्वातंत्र्य, समाज सुधारणा, सुविचार अशा घोषवाक्यची फलक हाती घेतले होते. विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्यमय घोषणांनी सर्व परिसर दुमदुमून गेला. नंतर प्रभात फेरी शाळेमध्ये आल्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. नंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर,धार्मिक, गीतांवर नृत्य, नाटिका, भाषण सादर केले. सर्व उपस्थित पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून पवार मॅडम, तसेच पालक प्रतिनिधी मधून उबाळे सर, तांदळे सर, प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच कार्यक्रमाचे मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तन्मय शेळके , विशाल सुपेकर, प्र.मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत ७८ वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आला.

### स्वातंत्र्यदिनानिमित्य शालेय साहित्याचे वाटप


पाटोदा : तालुक्यातील मौजे तळे पिंपळगावचे माजी सरपंच बाळासाहेब चौरे यांच्यातर्फे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्य तळे पिंपळगाव जि. प. प्राथमिक



शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी ध्वजारोहणाच्या मुख्य कार्यक्रमानंतर ४० विद्यार्थ्यांना बाळासाहेब चौरे यांच्यातर्फे रजिस्टर व पेनचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ह. भ. प. भरत महाराज चौरे, शशिकांत भीमराव चौरे, सरपंच स्नेहा शशिकांत चौरे, उपसरपंच सुरेखा मधुकर चौरे, ग्रामविकास अधिकारी संगीता माने, ग्रामपंचायत सदस्य बळीराम सरवदे, भाऊराव भिताडे, मोहन सुसलादे, किरण चौरे, मुख्याध्यापिका जयश्री जाधव, सहशिक्षक नंदिनी क्षीरसागर, अंगणवाडी कार्यकर्त्या शितल कोमटकर यांच्यासह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन नंदिनी क्षीरसागर यांनी केले. आभारप्रदर्शन जयश्री जाधव यांनी केले.

### सरगट मदतीच्या मागणीसाठी तहसीलदारला निवेदन

धारूर: २०२३चे सोयाबीन व कापुस पिक असणारे शेतक-याना अनूदान देण्याचा निर्णय राज्य शासनानेघेतला आहे. मात्र ई पिक पेरा ची अट घालून अनूदान याद्या तयार केल्या जात आहेत मोबाईल अप द्वारे ई पिक पेरा करणारे शेतकरीया अनूदाना पासून वचिंत राहत आहे हे अनूदान सरसगट द्यावे आशी मागणी धारूर तालुक्यातील शेतक-यानी केली असून धारूर तहसीलदार मार्फत निवेदन देण्यात आले आहे. राज्य शासनाने गतवर्षी सोयाबीन व कापुस पिकाचे नुकसान अनूदान दिले होते २०२३ मधील कापुस व सोयाबीन उत्पादक शेतक-याना अनूदान देण्याची घोषणा केली मात्र ई पिक पेरा असणे बंधनकारक करून कापूस व सोयाबीन उत्पादक अनेक शेतकरी या अनूदाना पासुन वचिंत राहणार आहेत मोबाईल अप द्वारे ई पिक पेरा नोंद करणारे शेतकरी या अनूदाना पासून वचिंत राहणार आहेत खरा शेतकरी या अनूदाना पासून वचिंत राहणार आहे त्यामुळे २०२३ चे कापुस व सोयाबीन अनूदान सरसगट हे पिक उत्पादक शेतक-याना देण्यात यावे आशी मागणी राज्य शासनाकडे तहसीलदार कडे निवेदन देऊन करण्यात आली हे निवेदन देताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनिल शिनगारे युवक नेते विनायक शिनगारे संजय तिबोले, अजित शिनगारे, बाबासाहेब नखाते, बड्डु काळे सह शेतकरी मोठ्या सख्येने उपस्थीत होते



# ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनो अष्टपैलू व्हा- सुभाष सारडा

## आदित्य शिक्षण संस्थेत स्वातंत्र्य दिन

बीड । प्रतिनिधी

प्रत्येकाने ध्येय निश्चित केल्यानंतर ते साध्य करताना कठोर मेहनत घेतली पाहिजे. शिक्षणाशिवाय ध्येय साध्य करता येत नाही. विद्यार्थीदशेमध्ये आपल्या करिअरवर फोकस केले पाहिजे. आपल्यातील कला- गुण ओळखून अष्टपैलू झाले पाहिजे. तेव्हाच आपले ध्येय साध्य करता येईल असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा यांनी केले.शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सुभाषचंद्रजी सारडा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



कार्यक्रमाला वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉक्टर आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, सि.ए. गिरीशजी गिल्डा, प्रशासकीय अधिकारी डॉ. संतोष लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलतांना सुभाषचंद्रजी सारडा म्हणाले की, आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबर त्यांच्यातील कला- गुणांना वाव देण्यासाठी नेहमीच विविध स्पर्धा , कार्यक्रम राबवले जात आहेत. अशा कार्यक्रमांमधून विद्यार्थी घडतात. आज आपल्या संस्थेतील विद्यार्थी मोठ-मोठ्या पदावर आहेत. याचा अभिमान आहे. आदित्य शिक्षण संस्थेत आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी येथील दर्जेदार शिक्षणाचा लाभ घेऊन भविष्य घडवावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सुभाषचंद्रजी सारडा यांच्या हस्ते फूड पायलट प्लांटचे उद्घाटन करण्यात आले. पॉलिहाऊस मध्ये नवीन प्रकारे कारले या पिकाचे उत्पादन कसे घ्यायचे याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमासाठी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आपेट, आदित्य जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे, फूड महाविद्यालयाचे प्राचार्य भुतडा, ॲग्रीकल्चर इंजनिअरिंग महाविद्यालयाचे प्राचार्य सानप, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य सत्कर, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य बहिरवाल, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य रामेश्वर ढोबळे ,आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. समीरा कुरेशी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आदित्य फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. हिंगणे यांनी तर आभार प्रदीप काठोळे मानले. आदित्य शिक्षण संस्थेतील महाविद्यालयातून दरवर्षी उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार दिला जाते. यंदा तो आदित्य जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाला देण्यात आला. याबरोबरच उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराने ढोबळे व आदित्य दंत महाविद्यालयाचे डॉ. समीरा कुरेशी यांचा सन्मान करण्यात आला.

# नियमितपणे आरोग्य तपासणी आवश्यक -मिसाळ

पाटोदा । प्रतिनिधी

आजच्या धकाधकीच्या जीवनात वातावरणात अनेक नवनवीन रोगजंतूंचा प्रादुर्भाव होत असून त्यापासून बचाव करण्यासाठी व आपले शारीरिक आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी नियमितपणे आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन हैद्राबाद स्थित बेअर क्रॉप सायन्स प्रा. लि. मध्ये इन्व्हेंटरी मॅनेजमेंट असोसिएट पदावर कार्यरत तुकाराम मिसाळ यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १६ ऑगस्ट रोजी कर्मचारी कल्याण समिती व




सूक्ष्मजीवशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्बोधनपर व्याख्यानात ते अतिथी वक्ता म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, उपप्राचार्य नामदेव चांगण उपस्थित होते.'पॅथॉलॉजिकल अॅनॅलिसिस' या विषयावर आयोजित व्याख्यानात तुकाराम मिसाळ यांनी विविध रोगांचे निदान करण्यासाठी आवश्यक रक्तचाचण्यांची सविस्तर माहिती देत आवाहन केले कि यकृत कार्यप्रणाली चाचणी (एलएफटी), किडनी कार्यप्रणाली चाचणी (केएफटी) तसेच सीबीसी व लिपिड प्रोफाइल या चार चाचण्या दर सहा महिन्यांनी केल्या पाहिजेत. प्रयोगशाळेतील चाचण्या योग्य वेळीच करून घेतल्या तर उद्भवू शकणाऱ्या रोगांचे उपचार वेळेवर करणे शक्य होते.अध्यक्षीय समारोपात डॉ. अभय क्षीरसागर यांनी उत्तम आरोग्यासाठी आहाराचे महत्व व आजारादरम्यान औषधोपचार डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व नियमितपणे घेण्याचे महत्व विषद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरद पवार यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# वाघोरा जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात



माजलगाव। प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट गुरुवार रोजी माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या मंगलमय वातावरणामध्ये देशभक्तीपर गीत वाजत गाजत विद्यार्थ्यांच्या घोषणांचा आवाज मोठ्या उत्साहात गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक प्रमुख पाहुणे मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमापूजन करून ध्वजारोहण तिरंगा ध्वजास मान वंदना देण्यात आली नंतर राष्ट्रगीत गायन झाले. प्रमुख पाहुणे व मान्यवरांचा स्वागत सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी भाषणे केली गीत गायन देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे श्री. दीपक माने हे अमेरिकेमध्ये इंजिनियर आहेत त्यांनी आपल्या देशात च्या काही ना काही ऋणातून उतराई होण्यासाठी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना २०० स्कूल बॅग वाटप केल्या व शाळेसाठी मदत २५ हजार रुपयाची वस्तू देण्याचे आश्वासन सुद्धा दिले. वाघोरा गावचे प्रथम नागरिक सरपंच श्री. मधुकर नाना बादाडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा सत्कार केला त्यावेळी त्यांनी शाळेला ११ हजार रुपये देणगी देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बादल डेंगळे होते तर प्रमुख पाहुण मा. पं. स.सदस्य करीम कुरेशी, उपसरपंच शेख बाबुभाई ,ग्रामपंचायत सदस्य अजय भैय्या राऊत,सचिन महाराज काष्टे,होते. प्रमुख उपस्थिती शा.व्य.स. अध्यक्ष अरुण बादाडे उपाध्यक्ष गणेश बादाडे, माजी सैनिक मधुकर माने या मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद जाधव यांनी केले. सूत्रसंचालन, नृत्य मार्गदर्शन केशव बादाडे व राहुल खुणे यांनी केले. शिक्षक राजेभाऊ अबुज, तुळशीदास गुंदेकर, संतोष ढोणे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य श्रीराम बादाडे,बापू बादाडे, लखन बादाडे, गणेश बादाडे, रामप्रसाद बादाडे यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार बबन पोटे सरांनी मानले. कार्यक्रमास गावकरी माता पालक विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अध्यक्षपदी पुनम घडसिंगे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

पुनंदगाव येथील शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचनेची बैठक आज दिनांक १६ ऑगस्ट रोजी गटशिक्षण कार्यालयातील पोटभरे सर यांच्या अध्यक्षतेखाली व केंद्रप्रमुख झोंबाडे सर मुख्याध्यापक किर्ते सर, सरपंच रुद्रा कुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार अनंत घडसिंगे यांच्या पत्नी पुनम घडसिंगे तर उपाध्यक्षपदी जयश्री गणेश काचूळे यांची खेळीमेळीच्या वातावरणात निवड करण्यात आली.या वेळी सदस्यपदी श्रीमंत पांडुरंग घडशिंगे, संगीता सतीश वानखेडे, मच्छिंद्र रतन क्षीरसागर, पूजा विकास घडशिंगे, भीष्मा अश्रूबा लोखंडे, नितीन रामभाऊ घडशिंगे, दिपाली परमेश्वर मुळे, अशोक भीमराव घडसिंगे, शेख अमजद इसुफ,तर प्राधिकरण सदस्य म्हणून विजयकुमार कटारे सर, विद्यार्थी प्रतिनिधी चि. यश सिद्धार्थ कदम, कु. कृष्णाजी संतोष लाड तर सचिव पदी भागवत रानोजी किर्ते यांची निवड करण्यात आली.

यावेळी पत्रकार अनंत घडशिंगे,ग्रा.सदस्य भारत घडसिंगे ,ग्रा.सदस्य प्रल्हाद कुरे, बालाजी लोखंडे , भारत सातपुते, भीमराव घडसिंगे, रामभाऊ घडसिंगे ,जयराम अवचार, श्रीधर मुजमुले, बाळासाहेब मुजमुले,विकास घडसिंगे ,यांच्यासह पुनंदगाव, नांदूर, नागझरी, चिंचगव्हाण परिसरातील महिला व पालक उपस्थित होते. या निवडबद्दल गटशिक्षण अधिकारी कार्यालयातील पोटभरे सर , केंद्रप्रमुख झोंबाडे सर ,शाळेचे मुख्याध्यापक किर्ते सर, कटारे सर, गडगे सर, मोठे मॅडम, आबुज मॅडम यांनी स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार अनंत घडसिंगे यांच्या पत्नी पूनम घडसिंगे यांची निवड झाल्याबद्दल मराठा आरक्षणाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांनी सराटी अंतरवाली येथे पत्रकार अनंत घडसिंगे यांचा विशेष सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रविशंकर विद्यालयात स्वातंत्र्यदिन

बीड । प्रतिनिधी

श्री श्री रविशंकर बाल मंदिर आदर्श नगर व श्री श्री रविशंकर विद्या मंदिर पिंपरगव्हाण रोड, बीड येथे दिनांक १५ ऑगस्ट गुरुवार रोजी ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे सदस्य जैन, संस्थेचे सचिव पारगावकर, शाळेचे मुख्याध्यापक हंसे, उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी, आदर्श नगर शाखेच्या समन्वयक प्राजक्ता देशमुख मॅडम, प्रमुख पाहुणे पियुष जैन व गोविंद लोळगे यांच्या हस्ते महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाष चंद्र बोस व भारत माता तसेच रविशंकर गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.

प्रमुख पाहुणे पियुष जैन, गोविंद लोळगे, शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी तसेच मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने २०२३ -२४ या शैक्षणिक वर्षातील दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व सर्व विषय शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. इयत्ता पहिली, दुसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले तसेच काही विद्यार्थ्यांनी मराठी ,इंग्रजी व संस्कृत अशा विविध भाषेतून आपले वक्तृत्व सादर केले.

# राष्ट्र विकासामध्ये युवकांचे योगदान महत्त्वाचे -ओमप्रकाश शास्त्री

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात भित्तीपत्रक विमोचन व व्याख्यान

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्र विकासामध्ये युवकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन वाराणसी, उत्तर प्रदेश येथील योगाचार्य व प्रतिथयश वैदिक विद्वान आचार्य पंडित ओमप्रकाशजी शास्त्री यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित भितीपत्रक विमोचन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी मंचावर प्रसिद्ध गायक, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा उदगीर येथील पंडित प्रतापसिंहजी चव्हाण व कार्यक्रमाचे अध्यक्ष अॅड.विश्वास जोशी, स्थानिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, संतोष अब्बड, लक्ष्मीकांत जोशी, लक्ष्मीनारायण मुंदडा, पवन मानधने, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे




यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणाले की, प्रत्येक भारतीय युवकांनी आपला राष्ट्रध्वज तिरंगा, आपले राष्ट्रगीत व आपले संविधान याविषयी अभिमान बाळगावयास हवा. आपल्या देशातील प्रत्येक राष्ट्रीय संपत्तीचा जर आपण अभिमान बाळगला तरच आपल्यामध्ये राष्ट्रभक्ती रुजवेल. ही राष्ट्रभक्ती रुजवण्यासाठी त्यांनी जपान देशातील एका नागरिककाचे उदाहरण देऊन जपानी नागरिक कसे राष्ट्रभक्ती जोपासतात हे पटवून दिले. त्याप्रमाणे आपणही जर आपल्या देशामध्ये आपल्या देशाचा अभिमान उंचावयाचा असेल तर राष्ट्रभक्ती आपल्या मनामध्ये रुजवणे अत्यंत गरजेचे आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी पंडित प्रताप सिंहजी चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले व आपल्या देशभक्तीपर गीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. व राष्ट्रभक्तीचा संदेश त्यांनी आपल्या भाषणातून दिला. अध्यक्षीय समारोप करताना अॅड.विश्वास जोशी म्हणाले की, आजचा प्रत्येक युवक हा राष्ट्रभिमानीच असावयास हवा तरच उद्याच्या भारताचे भविष्य उज्वल होईल. आपल्या चरित्र व नैतिक वर्तन चांगले असेल तर आपल्या देशाकडे कोणीही वाकड्या नजरेने पाहणार नाही. व आपले राष्ट्र सतत उन्नतच होत राहील असा संदेश त्यांनी याप्रसंगी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.युवराज मुळये यांनी केले तर आभार डॉ. गजानन होन्ना यांनी मानले. या प्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक डॉ. कमलकिशोर लड्ढा प्रा.अंकुश साबळे तसेच सर्व प्राध्यापक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. त्यानंतर सर्व विभागाचे भितीपत्रकाचे सादरीकरण करण्यात आले. त्याप्रसंगी देखील विद्यार्थ्यांनी आपल्या विभागाच्या माध्यमातून तयार केलेल्या भितीपत्रकाचे प्रमुख पाहुण्यासमोर सादरीकरण केले. कार्यक्रमाचा समारोप शांती मंत्राने करण्यात आला.

# डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त आयुष्मान भारत योजनेचे मोफत कार्ड वाटप व नेत्र शस्त्रक्रिया शिबिर

## श्रीराम जन्मोत्सव समिती व देवदूत प्रतिष्ठानचा अभिनव उपक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. माजलगाव येथे झालेल्या अभिनव व लोकोपयोगी कार्यक्रमातून शेकडो महिला व पुरुषांना आयुष्मान भारत योजनेचे मोफत कार्ड वाटप करण्यात आले. तर शेकडो ज्येष्ठ नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यातील गरजू लाभार्थ्यांच्या डोळ्याची मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांचे मोफत फार्म भरून देण्यात आले.

येथील वैष्णवी मंगल कार्यालय येथे श्रीराम जन्मोत्सव समिती, माजलगाव व देवदूत प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. ओमप्रकाश शेटे यांना शुभेच्छा देण्यासाठी सिंदफना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवन, डॉ प्रशांत पाटील, नगरसेवक विनायक रत्नपारखी, रामराजे रांजवण, रफिक तांबोळी, बाबासाहेब आगे, दत्ता महाजन, नानासाहेब घोडके, सुभाष कांबळे, नामदेव मुळे यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रिसिअस केक या नावाजलेल्या कंपनीचे संचालक अतुल तोडकर यांनी बनवलेला डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा जीवनपट उलगडणारा आगळावेगळा व भव्यदिव्य केक या कार्यक्रमाचे आकर्षण ठरला. सदरील शिबिरात मोफत नेत्र चिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया,आयुष्मान भारत कार्डचे मोफत वाटप, लाडकी बहिण योजनेचे मोफत अर्ज भरणे आदी उपक्रम राबविण्यात आले. यास तालुकाभरातील महिला-पुरुष बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला. यावेळी ३६० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यातील ४४ रूग्णांवर उदयगिरी नेत्रालय उदगीर या नामांकित रुग्णालयात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. यावेळी ६०० पेक्षा जास्त लाभार्थ्यांना आयुष्मान भारत कार्ड चे मोफत वितरण करण्यात आले. तर लाडकी बहिण योजनेचे शंभर वर महिलांचे अर्ज भरून देण्यात आले. कार्यक्रमाचे बहारदार संचलन अशोक वाडेकर यांनी केले. प्रास्ताविक विक्रम शिरसट यांनी तर आभार किशोर उनवणे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीराम जन्मोत्सव समिती चे स्वयंसेवक किशोर उनवणे, शुभम अस्वले, अजय रांजवण, सौरभ जाधव, विक्रम सिरसट, स्वप्नील खुरपे, रामेश्वर मेंडके, चैतन्य आहेर, अनिल साळवे, सुरज तिवारी, अभिजीत कोंबडे, मनोज कोरडे, कौस्तुभ जोशी, गणेश मिटकरी, शिवम भरकवडे, अक्षय दळवे, अजय राठोड, राम शिंदे, धीरज सेलुकर, कृष्णा मालपाणी, विकास कुंभकर्ण आदींनी परिश्रम घेतले. डॉ. ओमप्रकाश शेटे यांना शुभेच्छा देण्यासाठी समाजातील विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते.




# उमापूरचे ग्रामीण रुग्णालय गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल - आमदार लक्ष्मण पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

उमापूर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारत व कर्मचाऱ्यांची निवासस्थाने बांधकामासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत तब्बल ०७ कोटी ८८ लक्ष ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी मंजूर झाल्यानंतर केंद्र सरकार व राज्य सरकारचे आमदार लक्ष्मण पवार यांनी आभार व्यक्त केले. हे ग्रामीण रुग्णालय उमापुर पंचक्रोशीतील गोरगरीब गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल अशी भावना आमदार लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून व्यक्त केली.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात पुढे आमदार पवार म्हणाले की,उमापूर येथे नव्याने ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यासाठी राज्याचे तत्कालीन आरोग्य मंत्री दीपकजी सावंत व तत्कालीन आरोग्य संचालक डॉक्टर बी. डी. पवार यांच्याकडे सतत पाठपुरावा केला. आपण केलेल्या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले व उमापूर पंचक्रोशीतील



**नवीन इमारत बांधकामासाठी तब्बल ०८ कोटी रुपये मंजूर**

गोरगरीब गरजू रुग्णांना उत्तम आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाने उमापूर येथे ४ जून २०१९ ला शासन आदेश पारित करून विशेष बाब म्हणून नवीन ग्रामीण रुग्णालय मंजूर केले.

ग्रामीण रुग्णालयाला मंजुरी मिळाल्यानंतर रुग्णालयासाठी अद्यावत अशा प्रकारची इमारत असणे व रुग्णालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था असणे आवश्यक होते. तत्कालीन ◀◀ पान ३ वर

# पालकमंत्री मुंडे यांच्या हस्ते लाडकी बहीण योजनेच्या मदत केंद्राचे उद्घाटन

बीड। प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनी तहसील कार्यालय, बीड येथे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मदत केंद्राचे उद्घाटन संपन्न झाले. आज सकाळपासूनच लाभार्थी बहिणींच्या बँक खात्यामध्ये योजनेची रक्कम जमा होऊ लागली. त्यामुळे ज्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली आहे. अशा आरती गणेश असलेकर, परविन गफ्फार सय्यद, समीना जब्बार सय्यद या बहिणींचा प्रातिनिधिक स्वरूपात पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी समितीचे अध्यक्ष अमर नाईकवाडे ,जिल्हाधिकारी अविनाश पाठक, तहसीलदार चंद्रकांत शेळके, मोईन मास्टर , फारुख आली पटेल, सचिन जाधव, बळीराम गवते, नगरसेवक प्रभाकर पोपळे, भैय्यासाहेब मोरे, गणेश तांदळे, जलील खान पठाण, अश्फाक इनामदार, रेखाताई फड, शिवलिंग बाप्पा मोराळे, बरकत पठाण, संतोष क्षीरसागर, रामदास सरवदे, शेख रहीम, केशव तांदळे, संतोष चांदणे, अशोक शिंदे, गौरव जावळे, रमेश लांडगे, शेख कलीम (शेरू), गणेश मानकूस, विलास डिंगणे, दत्तात्रय म्हेत्रे, दत्ता मानकर, सचिन तावरे, सुरज कदम, गणेश शित्रे, सय्यद रज्जाक, अशोक धुताडमल, संभाजी काळे, अक्षय तिडके, विशाल कोटूळे, मच्छिंद्र खरसाडे, अलीम पटेल, सचिन रेंगे, गोविंद वाघमारे, नितीन वीर, सतीश दूबाले, विकास गायकवाड, दीपक घोरपडे, पवन खूपसे, विजय रोकडे, किशोर माळगे, राहुल थोरात, संतोष जगवाल, कृष्णा इंगळे यांच्यासह समितीतील शासकीय सदस्य आदी उपस्थित होते.



# धारूर तालुक्यातील जी.प. विद्यार्थ्यांनी जुन्या गणवेशावर साजरा केला स्वातंत्र्य दिवस

किल्ले धारूर /प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा तील विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत गणवेश देण्यात येतात शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश देणे गरजेचे असताना धारूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना शाळा सुरू होऊन दोन महिने झाले तरी गणवेश मिळाले नाहीत याला जबाबदार शिक्षण विभागाचा पाठपुरावा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना जुन्या गणवेशावर साजरा करावा लागला स्वातंत्र्य दिवस.

धारूर तालुका गटशिक्षण अधिकारी कार्यालयातील ढिसाळ नियोजनामुळे विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दोन महिन्यापासून मिळालेच नाही. यांनी पाठपुरावा न केल्यामुळे जिल्हा परिषदेच्या १३० प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळातील

**गटशिक्षण अधिकारी कार्यालयाचा पाठपुरावा नसल्याने जिल्हा परिषद चे मोफत गणवेश विद्यार्थ्यांना मिळालेच नाही**

विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारे मोफत गणवेश मिळालेच नाहीत स्वातंत्र्य दिन विद्यार्थ्यांनी जुना गणवेश घालून च साजरा केला स्वतंत्र दिना दिवशी विद्यार्थ्यांना मोफत मिळणारे गणवेश मिळाले असते तर स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित झाला असता परंतु गटशिक्षणाधिकारी व शिक्षण विभागाच्या हलगर्जीपणामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांना गणवेश बूट सॉक्स इत्यादी साहित्य मिळालेच नाही. जिल्हा परिषदेतील गोरगरिबांच्या मुलांना गुणवत्तापूर्वक शिक्षण ना दर्जेदार सुविधा मिळतात गटशिक्षण अधिकाऱ्यांनी लक्ष

# माजलगाव हरित करण्याचा रोटरी क्लब सेंट्रलचा संकल्प

## शहराच्या मुख्य रस्त्यावर केले वृक्षारोपण

**माजलगाव । प्रतिनिधी**

हरित माजलगाव ही संकल्पना रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल ने माजलगावकरांच्या मनात रुजवली असून त्या अंतर्गत शहराच्या विविध भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात येणार आहे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते माजलगाव च्या मुख्य रस्त्या मधोमध छ. शिवाजी महाराज चौक ते शहर पोलीस स्टेशन पर्यंत झाडे लावून हरित माजलगाव या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी माजी नगराध्यक्ष मंजूर शेख नारायणराव डक व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी माजी नगरसेवक शरद यादव विजय शिंदे रोटरी क्लब सेंट्रल चे अध्यक्ष रो.पांडुरंग चांडक सचिव रो.प्रभाकर शेटे प्रोजेक्ट चेअरमन रो.अंकुश राठोड रो.नारायण गंडे रो. कैलास येलशेट्टी इत्यादीच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

''हरित माजलगाव'' संकल्पने ◀◀ पान ३ वर



# सरकारच्या भुलभूलैय्या योजनेमुळे लाभार्थी झाले कर्जबाजारी-मयुरी मस्के

गेवराई । प्रतिनिधी

लोकसभेत युती सरकारला जनतेने नाकारताच आगामी विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर सरकार एकामागोमाग एक भुलभूलैय्या योजनांची घोषणा करत आहे. मात्र पुर्वी वाटलेल्या योजनेचे लाभार्थ्यांना पैसे मिळत नसल्याने ते कर्जबाजारी झाले आहेत, अशी आठवण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी मेलद्वारे करुन देत लाभार्थ्यांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्याची मागणी देखील यामध्ये करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांना केलेल्या मेलमध्ये मयुरी मस्के यांनी म्हटले आहे की, सन २०२४ लोकसभा निवडणुकीच्या आधी मतदारांना खुश करण्यासाठी व त्यांची मते मिळवण्यासाठी महायुती सरकारने ओबीसी घरकुल मंजूर केले. परंतु ओबीसी समाजाला मंजूर केलेले घरकुलाचे पैसे अजून मिळाले नाही. यामुळे आपल्या महायुती सरकार विरोधात प्रचंड जनता नाराज आहे, व याचा वचपा काढण्यासाठी जनता सज्ज आहे, अशी चर्चा सर्रासपणे चावडीवर केली जात आहे. दरम्यान पुन्हा आपल्या महायुती सरकारने एम.आर.ई.जी.एस. मार्फत मागेल त्याला विहीर योजना आणली, मागेल त्या सर्वांना विहीरीसह गायगोठा, पाणंद रस्ता, मोहगणी वृक्ष लागवड आशा अनेक योजना दिल्या देखील, परंतु या योजना मिळताच शेतकऱ्यांनी पदर पैशातून आपल्याला मंजूर झालेल्या विहिर तसेच इतर योजनेचे काम पूर्ण केले आहेत. मात्र या लाभार्थ्यांना देखील आपल्या सरकारने पैसे दिलेले नसून ते कर्जबाजारी झाले आहेत. त्यामुळे जनतेमध्ये आपल्या सरकारच्या विरोधात रोष असल्याचे जाणवते. यावरून आपल्या महायुती सरकारने वेळोवेळी मतदार जनतेची घोर निराशा तसेच फसवणूक केली. त्यांचा मतापुरता आपण वापर केला असून करत आहात, अशा प्रकारच्या चर्चा सर्रासपणे ग्रामीण भागातले लोक करत आहेत. त्याचबरोबर संजय गांधी निराधार, श्रावणबाळ या योजना राबवल्या जातात. परंतु याच योजनेचा अजून लाखो महिलांना लाभ मिळालेला नाही. लाखो महिला ◀◀ पान ३ वर



# दिंद्रुड येथे बाजार तळ जागेसाठी आमरण उपोषण, शुक्रवारी कडकडीत बंद

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील निजामकालीन बाजार तळावर कब्रस्तानच्या माध्यमातून होत असलेले अतिक्रमण हटवण्यासाठी व फेरफार रद्द करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांच्या वतीने काल दि१५ ऑगस्ट गुरुवार पासून येथील जुने बस स्थानकावर आमरण उपोषण चालू आहे. ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील व्यापाऱ्यांनीही शुक्रवारी बाजारपेठ कडकडीत बंद ठेवून उपोषणाला पाठिंबा दिला.गावात तणावपूर्ण शांततेचे वातावरण आहे. उपोषण स्थळी सीआरपीएफ (दंगल नियंत्रण पथक) तैनात करण्यात आली असून, शुक्रवारी सकाळी या पथकाने व दिंद्रुड पोलिसांनी पथसंचलन करत शांततेचे आवाहन ग्रामस्थांना केले.

येथील निजामकालीन आठवडी बाजार तळावर गेल्या वर्षभरापासून वेगवेगळ्या ठिकाणी अतिक्रमण होत असल्याने येथील बाजार संपुष्टात येण्याची वेळ आली आहे. याचा परिणाम म्हणून भविष्यात दिंद्रुडसह २५ ते ३० गावखेड्यांच्या शेतकरी व व्यापाऱ्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. येथे होत असलेल्या एका समाजाच्या अतिक्रमणा बाबत दिंद्रुड मध्ये वाद निर्माण झाला आहे. गट नंबर ७३१ मधील फेरफार नंबर २१२७ हा फेर चुकीच्या पद्धतीने ओढण्यात आलेला असून तो रद्द करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. याअगोदर देखील ग्रामस्थांनी ११ मार्च रोजी उपोषण केले होते. तत्कालीन तहसीलदार वर्षा मनाळे यांनी लवकरात लवकर चौकशी अंति अहवाल सादर करून योग्य तो निकाल देणार असल्याचे सांगितले होते. तहसीलदार यांच्या कोर्टात सहा महिने तारखा करून देखील दिंद्रुड ग्रामस्थांना ◀◀ पान ३ वर




# वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.रोहिदास येवले तर सचिव पदी ॲड. यासेर पटेल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक नुकतीच पार पडली. वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. रोहिदास येवले यांची निवड झाली. तर सचिव पदी ॲड. सय्यद यासेर पटेल यांची निवड झाली. वकील संघात नोटाला पडलेली मते आणि बाद मतांची संख्या ३०० वर पोचली. एक वर्षाच्या कार्यकाळासाठी ही निवडणूक झाली. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. रवींद्र किर्दत यांनी चोख कामगिरी बजावली.

अध्यक्षपदासाठी ॲड. रोहिदास येवले यांना ३३९ मते पडली. तर प्रतिस्पर्धी प्रभाकर आंधळे यांना २९२ मते पडली. तर गणेश करांडे यांना २२ मध्ये पडली. बाद ३ मते तर नोटाला १४ मध्ये पडली. या रोहिदास येवले ४७ मतांनी विजयी झाले. उपाध्यक्ष पदासाठी नितीन वाघमारे आणि अविनाश गडगे यांना समान मते पडल्यामुळे दोघांना सहा - सहा महिन्यासाठी कारभार वाटून देण्यात आला. तर सचीव पदासाठी सय्यद यासेर पटेल यांना ३२६ तर राम दहिवाळ यांना ३०५ मते पडली. बाद २५ मते तर नोटाला १४ मते पडली. नासेर पटेल हे २१ मतांनी विजयी झाले. सहसचिव पदासाठी श्रीकांत जाधव यांना २६५, वीरेंद्र थिगळे यांना २४५ तर दिनेश नाटकर यांना ८२ मते पडली. यामध्ये बाद मतांची संख्या ७३ आणि नोटाला ८ मते पडली. तर कोषाध्यक्ष पदासाठी धनंजय गिराम यांना ४०८ मते पडली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी शेख जावेद बशीर यांना २३२ मते पडली. यात बाद मतांची संख्या ५ तर नोटाला २५ मते पडली.

ग्रंथपाल सचिव पदासाठी ऍड. भीमा जगताप यांना ४१३ मते पडली. तर योगेश पवार यांना १८६ मध्ये पडली. या पदाला बाद मते ३६ तर नोटाला ३५ मध्ये पडली. महिला प्रतिनिधी या पदाला ऍड. छाया वाघमारे यांना ४०५ मध्ये तर ऍड मंदा संकपाळे यांना २३२ मते पडली. बाद मतांची संख्या ११ तर नोटाला २२ मते पडली.

संपूर्ण मतदान प्रक्रियेमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. रवींद्र किर्दत यांनी काम पाहिले. त्यांना उमेश धांडे, रमेश राऊत, सुधीर जाधव, सदानंद वाघमारे, लिंबराज लाखे, आणि हनुमान साबळे यांनी सहाय्यक म्हणून भूमिका बजावली. ◀◀ पान ३ वर



# विद्यमान आमदारांनी फक्त कुटुंबाचा आणि नातेवाईकांचा विकास केला -सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

माझे कुटुंब माझी जबाबदारी या धोरणानुसार.. मतदार संघातील जनता म्हणजे कुटुंब आणि विधानसभा सदस्य म्हणजे कुटुंबप्रमुख असे अपेक्षित असताना विद्यमान आमदारांनी ''माझा मतदार संघ, म्हणजे आपले नातेवाईक असलेले पुतण्या,जावई आणि मेव्हणा यांनाच कामे देऊन आपला आणि आपल्या कुटुंबांचाच विकास केला आहे मध्यंतरीच्या कोरोना काळात आष्टी तालुक्यामध्ये सर्वात जास्त मृत्यूची संख्या ही विद्यमान आमदार यांच्या शिराळ गावाची होती संकट काळात जर हे आपले गाव संभाळू शकले नाहीत.आणि आता निवडणुका जवळ आल्यावर खोट्या विकास कामांच्या आपल्या मनानेच घोषणा करीत आहेत असा आरोप माजीमंत्री सुरेश धस यांनी केला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने डोंगरगण,कडा,सुरुडी गणातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या शुक्रवार दि.१६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या जनसंवाद मेळाव्यात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना माजीमंत्री सुरेश धस बोलत होते.

या बैठकीस कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रमजान तांबोळी,शेरी चे संदीप खाकाळ,कडा येथील सरपंच युवराज पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे,भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष संजय आजबे यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना माजीमंत्री सुरेश धस म्हणाले की, माझे वडील हे मोठे गुत्तेदार होते मात्र मी १९९९ साली आमदार झाल्या नंतर आमच्या घरची गुत्तेदारी बंद झाली गुत्तेदारीचे रजिस्ट्रेशन सुध्दा रद्द झालं हे नम्रपणे सांगतो.परंतु सध्या आष्टी मतदार संघात काय चालले आहे ते बघा नुसते ब्लॉक बसविणे,सभागृह उभारणे त्यासाठी लागणारे साहित्य यांनी जिथे सांगायचं तिथूनच घ्यायचं त्यासाठी सिमेंट प्लांट यांचे,वाळू यांची,पत्रे यांचे आणि काम करताना गावातील कार्यकर्त्यांना जागा दाखवा म्हणून यांच्याच नातेवाईकांनी काम करायचे.त्यालाच विकासाचे गोंडस नाव देऊन माझे कुटुंब माझा माझा नातेवाईक आणि तेवढाच माझा मतदार संघ एवढेच काम या विद्यमान लोकप्रतिनधींकडून सध्या होत आहे.

सन २०१४ ला माझा पराभव झाला. त्यावेळेस भीमराव धोंडे निवडून आले.त्यांच्या पाच वर्षात त्यांनी ज्या योजनांचा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते नारळ फोडला ती सीना प्रकल्पातील पाणी मेहेकरी तलावात सोडणे ही योजना माझ्याच कार्यकाळात ९७% पूर्ण केली होती असे सुरेश धस यांनी सांगितले.

यावेळी कडा गणातील उपसरपंच दिपक कर्डीले,माजी उपसरपंच बाळासाहेब कर्डीले,संपत सांगळे,अनिल ढोबळे, संजय ढोबळे,बाळासाहेब कर्डीले,संजय मेहेर,अजित घुले, मधुकर गिऱ्हे, सचिन ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष
शनिवार दि.१७ ऑगस्ट २०२४ । पान ७

# देशातील युपीएससीचे २२ अधिकारी बोगस?

## आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांचा खळबळजनक दावा



पुणे : गेल्या काही दिवसांपासून राज्यात सर्वतोमुखी चर्चेचा विषय झालेल्या पूजा खेडकर प्रकरणानंतर असाच काहीसा खळबळजनक प्रकार पुढे आला आहे. देशातील एकूण २२ युपीएससीचे अधिकारी बोगस असल्याचा दावा कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे. एवढेच नाही तर या २२ अधिकाऱ्यांची नावे असणारी एक डॉक्युमेंट युपीएससी फाईल्स नावाने सोशल मीडियावर फिरत असून ती यादी देखिल विजय कुंभार यांनी समोर आणली आहे.

याबाबत युपीएससी आयोगाला पत्र लिहून, या सर्व अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी, या अधिकाऱ्यांना ज्यांनी मदत केली त्यांची देखील चौकशी करून कारवाई करण्याची मागणी विजय कुंभार यांनी केली आहे. या २२ मधील पुणे शहरातील एक अधिकारी असून राज्यातील देखील एकूण चार अधिकारी असल्याचा दावा केला जातो आहे. इतकच नाही तर हे सर्व आधिकारी राज्यात आएएस, आयपीएस आणि आयआरएस म्हणून कार्यरत असल्याचेही विजय कुंभार यांनी सांगितले. मध्यंतरी पूजा खेडकर यांच्या प्रकरणानंतर अशाच प्रकारचे काही प्रकरण उजेडात आले आहेत. अनेकांनी त्याबाबत तक्रार देखील दिल्या आहेत. त्यातील काही नाव सोशल मीडियामध्ये देखील पुढे आलेली आहेत. त्यातीलच एक फाईल म्हणजे यूपीएससी फाईल आहे. त्यात एकूण २२ यूपीएससीच्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. ज्यामध्ये या कथित अधिकाऱ्यांनी खोटी जात प्रमाणपत्र, खोटे उत्पन्नाचे दाखले, किंवा बनावट उत्पन्नाचे दाखले, बनावट डिसेबिलिटी सर्टिफिकेट इत्यादी कागदपत्रे दाखल करून त्यांनी नोकरी मिळवली आहे. या संदर्भामध्ये संबंधित अधिकाऱ्यांची माहिती घेतली असता विभागाकडे तक्रार केली आहे. यातील चौकशी करून दोशींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मी पत्राद्वारे केली असल्याची माहितीही विजय कुंभार यांनी दिली आहे.

हे प्रकरण पाहता देशाविरुद्ध एकप्रकारे युद्ध सुरू असल्याची एकंदरीत परिस्थिती आहे. कारण आयएएस ही देशातील सर्वोच्च परीक्षा असून सर्वात सुरक्षित अशी परीक्षा मानली जाते. इथून निवडून येणारे अथवा इथून परीक्षा पास करून येणारे अधिकारी देशातील एका महत्त्वाचे पद भूषवतात आणि अनेक निर्णय घेतात. त्यामुळे अशा परीक्षांमध्ये कुठल्याही उणीवांना स्थान नाही. त्यामुळे संबंधित प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेता आशांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केली आहे.

## लोकसहभागातून शेळगावच्या सर्व विद्यार्थ्यांना विमा कवच



इंदापूर : स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत गुरुवारी (दि.१५) इंदापूर तालुक्यातील पश्चिम भागातील शेळगाव ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येणाऱ्या आठ जिल्हा परिषद शाळा व नऊ अंगणवाडी केंद्रातील एकूण ८४८ विद्यार्थ्यांना रुपये १२ कोटी ७५ लक्ष रुपयांचे विमा संरक्षण प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून देण्यात आले आहे.

ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत जगताप यांच्या संकल्पनेतून इंदापूर तालुक्यातील शेळगाव येथील हा पहिला उपक्रम साकारला आहे. या उपक्रमाचे व ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत जगताप यांचे तालुक्यातील सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. शेळगाव अंतर्गत येणाऱ्या सर्व जिल्हा परिषद शाळेतील व अंगणवाडीतील ८४८ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे विमा संरक्षण व पन्नास हजार रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी भारतीय डाक विभागाच्या मार्फत देण्यात आली आहे. भारतीय डाक विभाग बारामती विभागाचे समीर कोरडे, मनीष सिंग,रुपेश मोरे यांनी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विमा पॉलिसी व मेडिकेल्म पॉलिसी बद्दल मार्गदर्शन केले.

इंदापूर तालुका पंचायत समितीची गटविकास अधिकारी सचिन खुडे,सरपंच उर्मिला लक्ष्मण शिंगाडे,उपसरपंच रेश्मा जाधव ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत जगताप,पत्रकार संतोष ननवरे,मोहन दुधाळ,रसुल शिंदे,ग्रामपंचायत सदस्य प्रताप चवरे,प्रशांत भुजबळ,सागर वाघमोडे,सदस्या अश्विनी तात्यासो शिंगाडे,स्वाती मनोहर शिंगाडे,राहुल जाधव,नितीन जाधव,अजय चवरे यांच्या लोकसहभागातून जमा करण्यात आलेल्या रकमेचा धनादेश भारतीय डाक विभाग बारामती या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्त करण्यात आला. याप्रसंगी सरपंच उर्मिला लक्ष्मण शिंगाडे,छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक अँड. लक्ष्मण शिंगाडे,हनुमान विकास सोसायटीचे संचालक बापूराव दुधाळ,माजी सरपंच रामदास शिंगाडे,राहुल जाधव,ग्रामपंचायत सदस्य पंडित ननवरे,प्रशांत भुजबळ, ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत जगताप यांच्यासह सर्व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक वर्ग अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

## मिसिंग मुलीच्या शोधकार्यासाठी आयुक्तांसह पोलीसांचा मोठा फौजफाटा रस्त्यावर

पुणे : स्वातंत्र्य दिनाच्या रात्री पुणे पोलिसांनी २४ तास सर्च ऑपरेशन राबवत एका हरवलेल्या मुलीचा शोध घेतला. या शोधकार्यासाठी आयुक्तांसह ४०० ते ५०० पोलीसांचा फौजफाटा कामाला लागला होता. मध्यरात्री कात्रज चौकात अचानक अनेक पोलिस अधिकारी आणि कर्मचारी हजर झाल्याने काहीकाळ नागरिकांमध्ये चर्चेचा विषय बनला होता. मात्र, रात्री २ वाजता हरवलेली मुलगी कोंढव्यातील एनआयबीएम रस्ता परिसरात मिळाली आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

मध्यरात्री अचानक साडेअकराच्या सुमारास पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पोलीस सहआयुक्त रंजन कुमार शर्मा यांच्यासह, पोलीस उपायुक्त, सहपोलीस



आयुक्त, पोलीस निरीक्षक आणि २०० ते २२५ पोलिस कर्मचाऱ्यांसह कात्रज चौकात भेट दिली. १४ ऑगस्टला दुपारी गौरी पटेल (वय १०) ही मतिमंद मुलगी शिवतेजनगर बिबवेवाडी येथून बेपत्ता झाली होती. बिबवेवाडी पोलिसांकडून तिचा शोध सुरू होता. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ती कात्रज परिसरातून गेल्याचे निदर्शनास आले. २४ तास उलटूनही मुलगी मिळत नसल्याने पोलीस आयुक्त यांनी रात्रीच्यावेळी सर्व वरिष्ठ अधिकारी व पोलिसांना कडक सूचना देत शोधमोहीम युद्धपातळीवर सुरु करण्याचे आदेश दिले. स्वतः कात्रज परिसरात येऊन परिसराची पाहणी केली.जवळपास दोन ते तीन तास पोलीसांकडून कात्रजपूल परिसरात शोधमोहीम घेण्यात आली. गुन्हे शाखेकडून शोध सुरु असताना रात्री दोनच्या सुमारास बेपत्ता मुलगी कोंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीत स्विगी डिलिव्हरी करणाऱ्या मुलाला मिळवून आली व त्यांनी ती पोलिसांच्या ताब्यात दिली. कात्रज परिसरामध्ये अचानक रात्रीच्या वेळी पोलीस आयुक्तांसह एवढ्या पोलिसांचा फौजफाटा आल्याने नागरिकांकडून वेगवेगळे तर्क-वितर्क लावण्यात येत असून नागरिक आश्चर्यचकितही झाले होते.

## शास्त्रीनगर चौकातील उड्डाण पूल, भुयारी मार्गास मंजुरी

पुणे: येरवड्यातील शास्त्रीनगर चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाच्या ९७ कोटींच्या प्रकल्प आराखड्यास महापालिकेच्या इस्टिमेट कमिटीच्या बैठकीत नुकतीच मंजुरी देण्यात आली. उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाच्या कामाला आता अल्पावधीतच सुरुवात होईल.

नगर रस्त्यांवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठीच्या विविध उपाय योजनांचा एक भाग म्हणून या उड्डाण पुलाचा प्रकल्प महापालिकेने हाती घेतला आहे. मात्र, पुरातत्त्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने हे काम रखडले होते. आता राष्ट्रीय पुरातत्त्व विभागाने उड्डाणपूल आणि भुयारी मार्गाच्या कामाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या दोन्ही कामांचा ९७ कोटींचा आराखडा पालिकेच्या एस्टिमेट कमिटीत मंजुरीसाठी ठेवला. बुधवारी झालेल्या बैठकीत त्याला मंजुरी मिळाली आहे.

## लोणावळा शहरात जागतिक दर्जाचा स्काय वॉक उभारत पर्यटन व्यवसायाला चालना देणार-अजित पवार

लोणावळा: शहराला ३३३ कोटी ५६ लाख रुपयांचा जागतिक दर्जाचा स्कायवॉक दिला आहे. येथील पर्यटन व्यवसाय वाढवण्यासाठी महायुतीच्या वतीने सर्वतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी दिली आहे. लोणावळा शहरामध्ये आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व अजित पवार यांची जन संवाद यात्रा आली होती. यावेळी लोणावळा शहरातील विविध संघटना ज्यामध्ये हॉटेल असोसिएशन, टॅक्सी संघटना, रिक्षा संघटना, व्यापारी संघटना, टपरी संघटना अशा विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. येत्या २० ऑगस्ट रोजी मुंबई येथे संयुक्त बैठकीत वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत चर्चा करून या सर्व विषयांवर तोडगा काढण्याचे आश्वासन अर्जदारांना पवार यांनी दिले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रुपाली चाकणकर, राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार, आमदार सुनील शेळके, सुरेश आण्णा घुले, बापूसाहेब भेगडे, दीपक हुलावळे, गणेश खांडगे, महाराष्ट्र प्रदेश महिला सचिव मंजूश्री वाघ, उमा मेहता, सुरज चव्हाण, भरत येवले, मारुती देशमुख, रवी पोटफोडे, जीवन गायकवाड, आदी




मान्यवर उपस्थित होते.मावळ तालुक्याचे आमदार सुनील शेळके यांनी लोणावळा शहर व परिसरामध्ये सुरू असलेल्या विकास कामांची माहिती अजितदादा यांना दिले तसेच लोणावळा शहरातील विविध संघटनांच्या समस्या विशद केल्या.अजित पवार म्हणाले जनसमान यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या महिला, मुली, शेतकरी, दुग्ध व्यवसाय यांच्या करिता असलेल्या विविध योजनांची माहिती दिली जात आहे. अजित पवार म्हणाले पर्यटनासाठी महाराष्ट्रातल्या काही मोजक्या शहरांप्रमाणे लोणावळा शहर हे उत्तम पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांना सुरक्षित पर्यटन करता यावे याकरिता उपाययोजना करणे गरजेचे आहे. लाँग वीकेंड आला की लोक फिरायला निघतात, निसर्गाचा आनंद घेण्यासाठी बाहेर जाण्याची प्रवृत्ती नागरिकांमध्ये वाढू लागली आहे.लोणावळ्यात खूप निसर्ग रम्य ठिकाणे आहेत. आम्ही लहान असताना पवार साहेबांच्या सोबत लोणावळ्यात येत असे. विकास होत असताना व्यवसायात बदल होणे अपेक्षित आहे. काळानुरूप काही बदल होत असताना आपण व्यवसाय कोठे केला पाहिजे याचा विचार आताच केला पाहिजे. हे सांगताना अजित दादा यांनी खोपोली व खंडाळा भागातील काही भजी व वडापाव यांच्या दुकानांच्या जुन्या आठवणी सांगितल्या. पीएमआरडीएच्या माध्यमातून स्काय वॉक प्रकल्प करत आहोत. खोल व्हॅली वर टफन ग्लास असणार आहे. तो करण्यासाठी टॉप मधील कंपनी निवडण्याचे काम आम्ही करत आहोत. टाटा कंपनी सोबत बोलून जल पर्यटनासाठी परवानगी द्या अशी मागणी करणार आहे. सरकार म्हणून काय करायचे ते करेल पण येणाऱ्या निवडणुकीत आमच्याकडे लक्ष ठेवा अशी मिश्किल टिपणी देखील दादांनी केली.

# जुन्नरच्या शेतकरी गिर्यारोहकांचा ६२५० मी.उंच कांगयात्से शिखरावर तिरंगा

शिवनेरी : जुन्नर तालुक्यातील तरुण गिर्यारोहक शेतकऱ्यांनी लद्दाख मधील तब्बल ६२५० मीटर उंच कांगयात्से २ शिखरावर यशस्वी चढाई करून स्वातंत्र्यदिनी तिरंगा फडकवला व राष्ट्रगीत गायले. शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशनचे अध्यक्ष निलेश खोकराळे यांच्या नेतृत्वाखाली विकास सहाणे, किशोर साळवी, अरूण रासकर व संतोष डुकरे या प्रशिक्षित गिर्यारोहकांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

शिवनेरी ट्रेकर्स मार्फत २०२७ मध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या माऊंट एव्हरेस्ट शेतकरी मोहिमेच्या तयारीचा भाग म्हणून भारतीय हिमालयासोबतच नेपाळ व इतर ठिकाणी गिर्यारोहण मोहिमांचे आयोजन सुरु आहे. कांगयात्से २ ही या मालिकेतील पहिली यशस्वी मोहिम ठरली आहे. सहभागी सर्व सदस्य शेतकरी ट्रेकर, गिर्यारोहक आहेत. स्थानिक गिर्यारोहक स्टेन्झिन नोर्ब्रू यांनी मोहिमेचे मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. कांगयात्से २ हे लदाख हिमालयाच्या झंस्कार पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखरांपैकी एक आहे. मार्खा व्हॅली व हेमीस राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात असलेल्या या हिमाच्छादित



शिखराची उंची ६२५० मीटर (२०,६०० फुट) आहे. आफ्रिका खंडातील किलिमंजारो व युरोप खंडातील माऊंट एलब्रुस या सर्वोच्च शिखरांहून अधिक उंच व आव्हानात्मक असलेले हे शिखर गिर्यारोहकांसाठी ते नेहमीच एक आव्हान ठरले आहे. शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन ही जुन्नरमधील शेतकरी तरुनांनी स्थापन केलेली ट्रेकिंग, गिर्यारोहण, ट्रायथलान, शोध व बचावकार्य इ साहसी क्रिडा कौशल्य संबंधित स्वयंसेवी संस्था आहे. संस्थेमार्फत दर वर्षी शिवजयंती निमित्त जुन्नर येथे राज्यस्तरीय शिवनेरी मॅरेथॉन चे आयोजन केले जाते. राज्य शासनासह जुन्नरमधील सर्व संघटनांचा त्यात सक्रिय सहभाग असतो.

### राज्य शासनाला अहवाल सादर होणार

या मोहिमेत सहभागी शेतकरी गिर्यारोहकांनी मार्खा खोर्यातील अतिशय संपन्न अशा पारंपरिक शेती पद्धतीचा मोहिमेदरम्यान तौलानिक अभ्यास केला असून, त्यातून पुढे आलेली महत्वपूर्ण माहिती व निष्कर्षांचा सविस्तर अहवाल राज्य शासनाच्या कृषी विभागास सादर करण्यात येणार आहे. हा अहवाल महाराष्ट्राच्या डोंगरी भागातील सेंद्रीय व नैसर्गिक शेती विकासासाठी महत्वपूर्ण ठरू शकेल, असा विश्वास खोकराळे यांनी व्यक्त केला.

## अजितदादांच्या जन सन्मान यात्रेला मावळात ‘रेकॉर्ड ब्रेक’ गर्दी!



मावळ : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जन सन्मान यात्रेला मावळ तालुक्यात तळेगाव दाभाडे येथे ‘रेकॉर्ड ब्रेक’ गर्दी पहायला मिळाली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राखी पौर्णिमेपूर्वीच मोठ्या धुमधडाक्यात तळेगावमध्ये महिलांनी रक्षाबंधन साजरे केले. महिलांच्या विक्रमी गर्दीमुळे सभा मंडप तर ‘ओव्हर फ्लो’ झालाच शिवाय तळेगावातील रस्त्यांवरही गर्दीचा महापूर अनुभवायला मिळाला.

मावळचे आमदार सुनील शेळके यांचे या कार्यक्रमाच्या निमित्ताने जोरदार शक्तीप्रदर्शन पाहायला मिळाले. अपेक्षेपेक्षा मोठी गर्दी झाल्यामुळे सभा मंडपात अनेकांना प्रवेश देखील मिळू शकला नाही. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याची वेळ संयोजकांवर आली. थोर समाजसेवक नथूभाऊ भेगडे शाळेचे मैदानात सुमारे २० हजार महिलांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्यक्षात ७० हजारांहून अधिक महिला या कार्यक्रमासाठी आल्यामुळे कार्यक्रम सुरू असताना मारुती मंदिर ते लिंब फाटा हा पूर्ण रस्ता भगिनींच्या गर्दीने ओसंडून वाहत होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आमदार शेळके यांच्या समर्थकांनी पूर्ण ताकद लावल्याचे पाहायला मिळत होते. जन सन्मान यात्रेला रक्षाबंधनाची जोड दिल्यामुळे सर्व भगिनी नव्या साड्या परिधान करून दागदागिने घालून नटून-थटून आल्या होत्या. त्यामुळे संपूर्ण तळेगाव शहराला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते.